रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४९ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in




# कृषीवल

रायगड ॥ मंगळवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२२
किंमत ४ ₹

## जिल्ह्यात ३२ रुग्ण; दोन जणांचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात सोमवार दि. १४ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या ३२ नव्या रुग्णांची नोंद झाली असून उपचारादरम्यान आज दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात ७११ रुग्ण कोरोनामुक्त झाले अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. सोमवारी पनवेल महापालिका हद्दीत १४, पनवेल ग्रामीण ३, खालापूर ४, कर्जत १, पेण २, अलिबाग २, मुरुड १, माणगाव १, रोहा १, सुधागड १ व महाड २ असे ३२ रुग्ण आढळले. उरण, तळा, श्रीवर्धन, म्हसळा व पोलादपूर या पाच तालुक्यात आज एकही नवीन रुग्ण आढळला नाही.

# सत्ताधारी, विरोधकांचा राडा

*राज्यातील सत्ताधारी शिवसेना, काँग्रेस विरुद्ध भाजप असा राजकीय संघर्ष चिघळत चालला असून, सोमवारी हे तिन्ही पक्ष मुंबई आणि कोकणात आमनेसामने आल्याने रस्त्यावरच वातावरण तंग बनले. घोषणाबाजीसह परस्परांवर आरोप, प्रत्यारोप करण्यात उभयतांनी धन्यता मानली. या तिन्ही पक्षांच्या नेते, कार्यकर्त्यांना आवरताना पोलीस यंत्रणेची मात्र दमछाक झाली.*

## मुंबईत भाजप, काँग्रेस रस्त्यावर



दिलीप जाधव

। मुंबई ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील जनतेचा अपमान केला असून त्यांनी माफी मागेपर्यंत भाजपा नेते, आमदार, खासदारांच्या घरापुढे, भाजप कार्यालयांपुढे आंदोलन करण्याची घोषणा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली होती. भाजपा कार्यालयांपुढे निदर्शने झाल्यावर सोमवारी फडणवीस यांच्या निवासस्थानापुढे आंदोलन केलं जाणार होतं.

## कोकणात शिवसेनेशी झटापट

। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।

कुडाळ नगर पंचायतीच्या निवडणुकीपूर्वीच शिवसैनिक आणि राणे समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला. नगरपंचायतीच्या आवारात वाहने नेण्यास मनाई असतानाही शिवसेना आमदार वैभव नाईक यांनी गाडी आत घुसवल्याने भाजप कार्यकर्त्यांनी त्याला आक्षेप घेतला. त्यामुळे शिवसैनिक आणि भाजप कार्यकर्त्यांत शाब्दिक चकमकी उडाल्या. दरम्यान, कुडाळच्या नगराध्यपदी काँग्रेसच्या आफ्रिन करोल या विजयी झाल्या आहेत.



त्यांना ९ मते मिळाली तर भाजपच्या प्राजक्ता बांदेकरांना ८ मते मिळाली आहेत. त्यामुळे नारायण राणे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

(सविस्तर वृत्त पान ५)

> आम्हाला संदेश द्यायचा असून आम्ही इथेही आंदोलन करु शकतो. काँग्रेसच्या हाकेला आज सर्वांनी साथ दिला आहे. महाराष्ट्राचा, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. आम्ही पोलिसांना सहकार्य करणार असल्याचं पहिल्यापासून सांगत आहोत. आमची अहिंसेची भूमिका आहे.
>
> – नाना पटोले, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

> नरेंद्र मोदींनी माफी मागण्याचा प्रश्नच नाही. माफी मागायची असेल तर देशाचं वाटोळे केल्याबद्दल काँग्रेसने मागावी. आमच्या दारात येऊन काँग्रेसने आंदोलन केले. त्याला भाजपने चोख प्रत्युत्तर दिलेले आहे.
>
> – देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते

## म ह त्वा चे

### गोवा, पंजाबमध्ये मतदानाला उत्साह

**नवी दिल्ली :** गोवा, पंजाब, उत्तराखंडमध्ये विधानसभा निवडणुकांसाठी सोमवारी प्रचंड उत्साहात मतदान झाले. उत्तरप्रदेशातही दुसऱ्या टप्प्याचे मतदान पार पडले. एकूण २८२ जागांसाठी ही निवडणूक घेण्यात आली. आता सर्वांना उत्सुकता लागली आहे ती १० मार्चला होणाऱ्या मतमोजणीची. गोव्यात ४०, उत्तराखंडमध्ये ७०, पंजाब ११७ तर उत्तर प्रदेशमध्ये दुसऱ्या टप्प्यातील ५५ जागांसाठी मतदान झाले. प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ६५ ते ७० टक्के मतदान झाल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. मतदानाच्या पार्श्वभूमीवर सर्वच मतदान केंद्रांवर कडक सुरक्षा तैनात करण्यात आली होती.

### पुलवामा हल्ला शहिदांना आदरांजली

**नवी दिल्ली :** जम्मू-श्रीनगर महामार्गावर पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यातील शहिदांना सोमवारी देशवासियांच्यावतीने आदरांजली वाहण्यात आली. या घटनेला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करून शहीद जवानांना आदरांजली वाहिली आहे. शहीद झालेल्या जवानांना आदरांजली वाहतो. त्यांचे सेवा आणि बलिदान देश कधीच विसरणार नाही असे मोदी म्हणाले.

### काम केले तरच मनरेगाचे पैसे

**नवी दिल्ली :** भ्रष्टाचार आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोदी सरकार आणखी एक पाऊल उचलण्याच्या तयारीत असून, मनरेगा कायदा अधिक कडक केला जाण्याची शक्यता आहे. नव्या कायद्यानुसार काम केल्यानंतरच मनरेगाच्या लाभार्थ्यांना पैसे दिले जाणार असून, यामुळे मध्यस्थी करणाऱ्यांवर अंकुश ठेवला जाण्यास मदत होणार आहे. गेल्या दोन वर्षांत ग्रामीण रोजगार कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून आल्या आहेत.

### अल्पवयीन मुलीची हत्या आणि बलात्कार प्रकरण

## पाच साक्षीदारांची साक्ष नोंदली

### ॲड उज्वल निकम यांचा युक्तीवाद

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पेण मळेघर आदिवासी वाडीवरील पीडित तीन वर्षीय मुलीवर शारीरिक अत्याचार करून तिला जीवे मारण्याची घटना २९ डिसेंबर २०२० रोजी घडली होती. याबाबतचा खटला अलिबागच्या जलदगती न्यायालयात सुरु झाला आहे. विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी या प्रकरणी सोमवारी पाच साक्षीदारांची साक्ष तपासली. तर आरोपी पक्षाचे वकील ॲड पोकळे यांनी युक्तिवाद केला. मंगळवारी देखील उर्वरित साक्षीदारांची साक्ष तपासण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा सरकारी वकील ॲड. भूषण साळवी यांनी दिली.


२९ डिसेंबर २०२० साली पेण मधील मळेघर आदिवासी वाडीवरील तीन वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली होती. पोलिसांनी या घटनेचा तपास करून आरोपी आदेश पाटील याला अटक केली. आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. तो अलिबाग येथे शिक्षा भोगत होता. पॅरोलवर तो त्या कालावधीत बाहेर होता. घरी आल्यावर त्याने हे घृणास्पद कृत्य केले होते. पेण पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात यावा यासाठी राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी जोरदार मागणी केली होती. या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ॲड उज्वल निकम याची नियुक्ती राज्य सरकारने केली आहे. अलिबाग येथे विशेष पोस्को न्यायाधीश शाहीदा शेख याच्या न्यायालायत सुनावणी सुरू आहे.

## रंगकर्मी घांग्रेकर यांचे निधन

। पेण । प्रतिनिधी ।

पेण येथील ज्येष्ठ रंगकर्मी पांडुरंग घांग्रेकर यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर विश्वेश्वर स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंयात्रेला ललित कला मंडळाचे तसेच नाट्य, सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.



भारतीय नाट्यपरिषदेत एक गुणी नाट्यसेवक म्हणून पांडुरंग घांग्रेकर हे सर्वश्रुत व सर्वज्ञात होते. ग्रामीण भागात घांग्रेकर संगीत शिबिरे आयोजित करून भक्ती दिंडी स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करून लोकांमध्ये सांस्कृतिक स्फुल्लिंग चेतविण्याचा सतत प्रयत्न करत होते.

वास्तविक घांग्रेकर हे अतिशय कसलेले कलावंत, दिग्दर्शक आणि लेखक होते. आतापर्यत त्यांनी पाटलांची औलाद, स्वर्गहरण, बदला, रामजानकी, पुत्रवती आदी नाटकांमधून आपली प्रतिमा सिद्ध केली होती. मुलांसाठी हुतात्मा, विघ्नहर्ता, जंमत जगावेगळी अशी बारा नाटके लिहून बालनाट्यकार हा बहुमान पटकावला होता ते नुसते नाटके लिहित नव्हते तर ती लिहून स्वतः दिग्दर्शक करून रंगभूमीवर सादर करीत होते त्यांच्या कारकीर्दीतील वंदे मातरम् महानाट्याचे ५१ प्रयोग महाराष्ट्रभर केले होते या नाटकामध्ये ४५० ते ५०० विदयार्थ्यांना एकत्र घेउन एक मोठा विक्रम केला होता. त्यांची नाट्यसेवा पाहूनच त्यांना अ.भा.नाट्यपरिषदेवर सदस्य म्हणून घेण्यात आले होते. पान २ वर

### क्लिक धुक्याची चादर



थंडीचा जोर अद्यापही कायम असून, पहाटेच्यावेळी रोहा शहर व परिसरात निर्माण झालेले मनमोहक दृश्य.

(छायाचित्र : सुधीर नाझरे)




## खा. गावित यांना शिक्षा

। पालघर। प्रतिनिधी ।

जमीन विकास कामी देण्यात आलेला चेक न वटल्याच्या कारणाने दाखल केलेल्या एका प्रकरणात पालघरच्या प्रथम वर्ग न्यायालयाने खासदार राजेंद्र गावित यांना एक वर्षाचा तुरुंगवास व पावणे दोन कोटी रुपयांची भरपाई रक्कम भरण्याचे करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशा नंतर खासदार गावित यांना जामीन मंजूर झाला असून रक्कम भरण्यासाठी अथवा आदेशाविरुद्ध स्थगिती घेण्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे. पालघरचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी विक्रांत खंडागळे हे आदेश सोमवारी ठोठावले. पालघर शहरामध्ये साईनगर जवळ असलेल्या एका भूखंडाचा विकास करण्यासाठी एक कोटी रुपयांसाठी करारनामा शहरातील विकासक चिराग कीर्ती बाफना यांच्यासोबत झाला होता. या कराराचे उल्लंघन करत राजेंद्र गावित यांनी हीच जागा अन्य विकासकाला विकसित करण्यासाठी दिली होती. तसेच जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून चिराग बाफना यांना विकास कामासाठी परवानगी देण्यास विरोध केला होता.

### वैद्यकीय महाविद्यालयाचे

## काम प्रगतीपथावर

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

तालुक्यातील उसर येथील नियोजित वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला वेग आला असून लवकरच सदर महाविद्यालयाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. त्यासंदर्भात तयारीच्या पाहणीसाठी पालकमंत्री अदिती तटकरे यांनी सोमवारी उसर येथील जागेची पाहणी केली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांच्यासह शासकीय अधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय महाविद्यालयासाठी अलिबाग जवळील उसर येथे एमआयडीसी व इतर मिळून ५० एकरहून अधिक जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर जागेत लवकरच भूमिपूजन करुन बांधकामाला प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यानुसार आज राज्यमंत्री तथा रायगडच्या पालकमंत्री आदिती पान २ वर

## घाऊक महागाई दरात घसरण

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशातील नागरिकांना महागाईतून काहीसा दिलासा मिळाला आहे. कारण घाऊक महागाईच्य दरात जानेवारी २०२२ मध्ये घट होऊन हा दर १२.९६ टक्क्यांवर पोहोचला. यामुळं गेल्या महिन्यात डिसेंबर २०२१ मध्ये हा आकडा १३.५६ टक्के होता. आर्थिक सल्लागारांच्या कार्यालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाईचा दर उच्चस्तरावर पोहोचला होता. नोव्हेंबर २०२१ मध्ये १२ वर्षांचा विक्रम तोडत घाऊक महागाईचा दर १४.८७ टक्क्यांवर पोहोचला होता. पण महागाईचा दराचे आकडे गेल्या काही काळापासून सातत्याने दोन आकडी राहिला आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत जानेवारी २०२२ मध्ये तेल, कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, धातू, रसायने आणि रासायनिक पदार्थ तसेच अन्न पदार्थ यांच्या दरवाढीमुळे महागाईचा दर जास्त होता, असं जाहीर करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मिळकत मालक श्रीमती पुजा देवदत्त नेवगी यांचे कडून रजिस्टर दस्ताऐवजाने विकत घेण्याची ठरवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जिल्हा - रायगड**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| चेंढरे | ३६/१/२/१ | २.२८.००. चौ.मी बिनशेती प्लॉट | २८.८० |

सदरची मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदर मिळकती मधील बांधकामासह, लहान - मोठी झाडे, अंर्तभूत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत इतर कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, गहाण, कुळवहीवाट, दान, बक्षिसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट किंवा मिळकतीतून येण्याजाण्याचा मार्ग वगैरे तसेच होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणर नाही व आमच्या अशिलास नंतर ही मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

कळावे...

दि. १४/०२/२०२२

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**(ॲड. श्वेता अमित नारे)**
गंगासागर बिल्डिंग, बी विंग,
पहिला मजला, घुमकरवाडी जवळ,
कलेक्टर ऑफिस रोड, अलिबाग.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. धीरज तुकाराम सुतार रा.घर नं.८७२, दिनेश अपार्टमेंट, बी विंग, पांडुरंग सुतार गुरुजी मार्ग, सेक्टर १, शिरवणे गांव, नवी मुंबई, ठाणे ४०० ७०६ यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-शिंगढोळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत**

| भोगदारांचे नांव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्रीम.रजनी अरुण पाटील व इतर २ | १/७ | ०-१९-०० | ०-१२ |

**तदंगभुत सर्व हक्कहितसंबंध यासुद्धा**

तरी सदर मिळकतीत अथवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांकः१५/०२/२०२२
ठिकाणः कर्जत

**ॲड.उषा जे.कांबळे**
पत्ताः सरावते निवास, नाना मास्तर,
ता.कर्जत,जि.रायगड ४१० २०१.
मो.नं.७३८५००४८०६

## पाहिजेत

खाली नमूद केलेल्या लोकसंचलित साधन केंद्र सीएमआरसीद्वारा सल्लागार म्हणून ११ महिने कालावधीसाठी उपजीविका सल्लागार नेमावयाचे आहे. कृपया खालील निकषानुसार पात्र इच्छुक उमेदवारांनी संबधित सीएमआरसी कडे कार्यालयीन वेळेत दिनांक. ०५/०३/२०२२ पर्यंत अर्ज करावेत. मेलद्वारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

पदाचे नांव : उपजीविका सल्लागार

पदांची संख्या : ३ (खाली नमूद लोकसंचलीत साधन केंद्र प्रत्येकी १)

शैक्षणिक अर्हता व अनुभव : १.कृषी/पशुसंवर्धन अथवा तत्सम निगडीत क्षेत्रातील पदवी
२. संबधित क्षेत्रात कार्यक्षेत्रात काम करण्याचा किमान ०२ वर्षाचा पदव्युत्तर अनुभव
३. व्हॅल्युचेन प्रकल्प आखणी राबविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य

वयोमर्यादा : ४० वर्षापर्यंत

संगणक : MSCIT/तत्सम डिप्लोमा आवश्यक, मायक्रोसॉफ्ट वर्ड/एक्सेल वापरता येणे अत्यावश्यक

मानधन : प्रती माह रु.१५०००/- पर्यंत मानधन (नियमानुसार सेवा कर)

अनुभव व पात्रतेनुसार मानधन ठरविण्याचे अधिकार संबधित अध्यक्ष सीएमआरसी यांचे कडे राहतील

अर्ज करण्याचा पत्ता :

१. मा. अध्यक्ष, प्रगती लोकसंचलीत साधन केंद्र, कर्जत भूखंड न. ८७, २ माळा, म्हाडा कॉलनी कर्जत,ता कर्जत, पोलीस ग्राउंड समोर जि रायगड पिन नं ४१०२०१ संपर्क क्र. ७५०७३१३७६३, ९२७०५०८८३५

२. मा. अध्यक्ष, सावित्रीबाई फुले लोकसंचलीत साधन केंद्र, महाड , सुशीला बंगला , सरेकर आळी ता. महाड ४०२३०१ जिल्हा.रायगड ०२१४५-२२२०२१ संपर्क क्र. ८३७८०१९९३६, ८६००८२०२४७

३. मा. अध्यक्ष, ओम साई प्रेरणा लोकसंचलीत साधन केंद्र, श्रीबाग न.२, तोडकरी कोविड हॉस्पिटल जवळ अलिबाग शहर शिवसेना संपर्क कार्यालयाच्या बाजूला अलिबाग ता. रायगड ४०२२०१ संपर्क क्र. ८३०८२२००८८, ९३७०३९७४१६

---

**प्रो. फी. ५०/** | **अर्जदाराचे वकील : श्री. जितेंद्र लेले**

ने. ता.२५/०३/२०२२

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा. जिल्हा न्यायाधीश सो. यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज क्र.१०५/२०२१

श्रीमती शैला मंगेश धारपवार ... अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै. मंगेश भाऊ धारपवार यांचे दि. १/२/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पीटल येथे निधन झालेले आहे. त्यांचे पश्चात त्यांना अर्जदार ही विधवा पत्नी तसेच मुलगी रोशनी, वय १५ वर्षे, कु. रोहिणी वय १८ वर्षे व कु. रोहित वय १९ वर्षे अशी मुले आहेत.

कै. मंगेश भाऊ धारपवार यांचे एकत्र कुटूंबाची व सामाईक मालकीची मौजे विणेगाव, ता. खालापुर, जि. रायगड येथे ग.नं. ३९/२, क्षेत्र ०-४१-४०, पो.ख. ०-०२-८०, आकार ३.४६ अशा वर्णनाची मिळकत आहे. कै. मंगेश भाऊ धारपवार यांचे पश्चात त्यांचे हिश्श्याचे मिळकतीस वर नमुद केलेप्रमाणे अर्जदार व तिची मुले यांची नावे सदरहु मिळकतीचे ७/१२ सदरी लागलेली आहेत.

परंतु मुलगी रोशनी ही अज्ञान असल्यामुळे तिचे हिश्श्याची मिळकत विक्री करणेकरीता तिचे वतीने अज्ञान पालनकर्ती व नैसर्गिक पालक म्हणुन अर्जदार हिस परवानगी मिळणेकरीता पनवेल येथील न्यायालयात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, या जाहीर नोटीशीने तमाम लोकांस कळविण्यात येत आहे की, यांतील अर्जदार हिचे मागणीप्रमाणे ती कु. रोशनी मंगेश धारपवार हिचे हिश्श्याची मिळकत विक्री करणेस तिचे वतीने अज्ञान पालनकर्ती व नैसर्गिक पालक म्हणुन अर्जदार हिची नेमणुक करून तशी विक्री परवानगी मिळणेकरीता इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाचे आत या मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा विहीत मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराचे विनंतीप्रमाणे कु. रोशनी मंगेश धारपवार हिचे हिश्श्याची मिळकत विक्री करण्यास तिची पालनकर्ता म्हणुन अर्जदार हिस परवानगी देण्यात येईल व तद्नंतर येणाऱ्या येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०२/२०२२ माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला

**सही/-** लिपीक, जिल्हा न्यायाधीश, पनवेल | कोर्टाचा शिक्का | **सही/-** सहाय्यक अधिक्षक, जिल्हा न्यायधिश, पनवेल

---

**पान १ वरून**

## रंगकर्मी घांग्रेकर यांचे निधन

प्रथितयंश कंपनीच्या गाजलेल्या नाटकात भूमिका केल्यामुळे त्यांना दामू अण्णा मालवणकर, ज्योत्स्ना भोळे, प्रभाकर पणशीकर, मा.अविनाश, वसंत शिंदे, चित्तरंजन कोल्हटकर, सूर्यकांत मांढरे, हंसा वाडकर, वत्सला देशमुख, नयनतारा,रविराज, मंदा देसाई, सखाराम भावे, केशवराव मोरे, बाळ धुरी, कृष्णकांत दळवी, मोहन कोठीवान, संजिवनी बिडकर, बबन चव्हाण यांच्यासारख्या आणखी कितीतरी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंतासह श्री. घांग्रेकर यांनी नाटकांतून वेगवेगळया भूमिका करून आपल्या अभिनयाचे पैलू दाखवले. पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरच्या दिवार, पठाण या हिंदी नाट्यातून शशी कपूर यांच्याबरोबर घांग्रेकरांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा कुटुंब परिवार आहे. पांडुरंग घांग्रेकरांच्या ज्यानेने पेणकरांची मोठी सांस्कृतिक हानी झाल्याची प्रतिक्रिया पेणकर व्यक्त करत आहेत.

## वैद्यकीय महाविद्यालयाचे काम प्रगतीपथावर

तटकरे सदर जागेची पाहणी केली. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सुहास माने व शासकीय अधिकारी वर्ग यांच्यासह अलिबाग तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दत्ता ढवळे, युवक अध्यक्ष मनोज शिर्के, व्यापारी संघटना तालुका अध्यक्ष सचिन पाटील, उपाध्यक्ष जयेंद्र भगत, उपाध्यक्ष हेमनाथ खरसंबळे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष लवेश नाईक आदी उपस्थित होते.

## सुनिल पाटील यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**



शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते सुनिल एकनाथ पाटील यांचे (५३ वर्ष) निधन झाले. पाटील हे १९९७ साली शेकापतर्फे वशेणी ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले होते. माघी गणेश मित्रमंडळ वशेणी आणि राधाकृष्ण मंदिर जिर्णोद्धार कमिटीत ते सक्रिय सदस्य होते.तर आवरे पंचायत गणातून त्यांनी काही काळ विभागीय चिटणीस म्हणून पदभार सांभाळला होता.त्यांचा दशक्रिया विधी दि.२० रोजी वशेणी बहिरीदेवस्थान येथे होणार आहे.

### अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१५ फेब्रुवारी**

१) श्री. नरहरी डेकाटे
१५-०२-१९४१
घरत आळी, अलिबाग.

## जाहीर नोटीस

रोहे येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन यांचे कोर्टात
दिवाणी चौ.अर्ज नं.०७/२०२२
नि.०८/ड
ने.ता.१०.०३.२०२२

१) श्रीमती अनुराधा लक्ष्मण धुमाळ
वय ५९ धंदा : गृहिणी
रा.कल्पक हौसिंग सोसायटी, रोहा ता.रोहा
जि.रायगड
२) सौ.प्रियांका प्रितम भोईर
पुर्वाश्रमीची कु.प्रियांका लक्ष्मण धुमाळ वय ४२
रा.भाईदर (पुर्व) मुंबई
३)सौ.प्रियांजली अंकित पाटील
पुर्वाश्रमीची कु.प्रियांजली लक्ष्मण धुमाळ वय ४०
रा.सायन मुंबई ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाले

ज्या अर्थी कै. लक्ष्मण कमळ धुमाळ हे दि.१७/०५/२०२१ दिनांक (सतरा मे दोन हजार दोन हजार एकवीस) रोजी यशवंत खार ता.रोहा जि.रायगड येथे मुळ घरी मृत्यू झाला. कै.लक्ष्मण कमळ धुमाळ यांस त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं. १ ही पत्नी नं.२ व ३ ही मुलगी एवढेच जवळचे हयात कायेदशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशीर वारस नाहीत अर्जदार हे हिदूं धर्मीय आहेत. सदर अर्जदार यांना कै.लक्ष्मण कमळ धुमाळ यांचे पश्चात रोहा नगर परिषद हद्दीमधील रोहा नगर परिषद समोर सच्चिदानंद कॉमप्लेक्स या इमारतीमधील, तळ मजल्यावरील दुकान गाळा ज्यास म्युनिसीपल घर क्र.P2ARKD000038 क्षेत्र १०.२४ चौ.मिटर असा दुकान गाळा मिळकतीस वारस म्हणून नाव मोबदला करणेसाठी वारसपत्र ( हेअरशिप सर्टिफिटची) दाखल्याची नितांत जरुरी आहे. म्हणून मे कोर्टाकडे देण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर करावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि. / / २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-** कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क.स्तर रोहा | कोर्टाचा शिक्का | **सही/-** सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर रोहा

## जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येतेकी, आमचे अशील हे **एक्स्प्रेस इंटेरिअर्स अँड काँट्रॅक्टर्स एलएलपी**यांच्याकडून सदनिका क्रमांक सी - ३०३, क्षेत्र सुमारे १७०९ चौरस फूट, रेराकार्पेट एरिया, पहिला मजला सदरील सदनिका जी इनर सर्कल या प्रकल्पातआहे त्यासह १(एक) कार पार्किंग, जे भूखंड सुमारे ५२०१ चौरस मीटर्सक्षेत्रावर उभा आहे, प्लॉट क्रमांक १ ते ५, मौजे दत्तपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, (यापूर्वीच गट क्रमांक ८४, मौजे सरल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड नोंदणी जिल्हा रायगड,) उपजिल्हा अलिबाग, जिल्हा परिषद रायगड आणि पंचायत समिती अलिबाग यांच्या हद्दीत आहे, या मालमत्तेमधील हक्क, हक्क संबंध खरेदीने घेण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत. अशी कोणतीही व्यक्ती ज्यांचा वरील प्रमाणे नमूद केलेली सदनिका किंवा तिच्याकोणत्याही भागावर विक्री, हस्तांतरण, लीज, लिव्ह अँड लायसन्स, भेट, ताबा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे तसेच अन्य कोणत्याही माध्यमातून दावा किंवा हक्क असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे त्यांचे कार्यालय स्वागतम, ४ था मजला, प्लॉट क्रमांक १४१, एस व्ही रोड, खार पोलीस स्थानकाच्या समोर, खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ येथे या तारखेपासून १४ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा कोणत्याही दाव्याच्या किंवा हरकतीच्या अनुपस्थितीत आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील आणि त्यानंतर असल्यास दावे अधित्यजित समजण्यात येतील.

दिनांक : १४ फेब्रुवारी २०२२
**दिव्य शाह असोसिएट्स करिता**
भागीदार

---

**प्रो. फी. ५०/** | **अर्जदाराचे वकील : श्री. जितेंद्र लेले**

ने. ता.२४/०३/२०२२

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा. जिल्हा न्यायाधीश सो. यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज क.१०१/२०२१

श्रीमती लता रवी उर्फ रवींद्र मुकणे ... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै. रविंद्र मुकणे यांचे दि. २४/१२/२०११ रोजी मौजे कुशीवली निधन झालेले आहे. त्यांचे पश्चात त्यांना अर्जदार ही विधवा पत्नी तसेच अज्ञान मुले विशाल, वय १६ वर्षे, कु. निशा वय ११ वर्षे व कु. विशाखा वय १३ वर्षे अशी मुले आहेत.

कै. रविंद्र मुकणे यांचे एकत्र कुटुंबाची व सामाईक मालकीची मौजे विणेगाव, ता. खालापुर, जि. रायगड येथे ग.नं. ५०/४. क्षेत्र ०-१५-२०, पो.ख. ०-०२-५०, आकार ७.२१ अशा वर्णनाची मिळकत आहे. कै. रविंद्र मुकणे यांचे पश्चात त्यांचे हिश्श्याचे मिळकतीस वर नमुद केलेप्रमाणे अर्जदार व तिची मुले यांची नावे सदरहु मिळकतीचे ७/१२ सदरी लागलेली आहेत.

परंतु कु. विशाल, कु. निशा व कु. विशाखा ही मुले अज्ञान असल्यामुळे त्यांचे हिश्श्याची मिळकत विक्री करणेकरीता त्यांचे वतीने अज्ञान पालनकर्ती व नैसर्गिक पालक म्हणून अर्जदार हिस परवानगी मिळणेकरीता पनवेल येथील न्यायालयात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, या जाहीर नोटीशीने तमाम लोकांस कळविण्यात येत आहे की, यांतील अर्जदार हिचे मागणीप्रमाणे ती कु. विशाल, कु. निशा व कु. विशाखा यांचे हिश्श्याची विक्री करणेस त्यांचे वतीने अज्ञान पालनकर्ती व नैसर्गिक पालक म्हणुन अर्जदार हिची नेमणक करून तशी विक्री परवानगी मिळणेकरीता इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे. कोर्टात हजर लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा विहीत मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराचे विनंतीप्रमाणे कु. विशाल रविंद्र मुकणे, कु, निशा रविंद्र मुकणे व कु. विशाखा रविंद्र मुकणे यांची हिश्याची मिळकत विक्री करण्यास त्यांची पालनकर्ता म्हणून अर्जदार हिस परवानगी देण्यात येईल व तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/' **लिपीक** जिल्हा न्यायाधीश पनवेल, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- **सहाय्यक अधिक्षक,** जिल्हा न्यायधीश, पनवेल

## ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली ता.कर्जत, जि.रायगड
### निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली हद्दीतील खालील विकास कामे ग्रामपंचायत स्तर १५ वा वित्त आयोग जि.पं./पं.स.सेस अनुदानातील कामे ग्रामनिधी, जनसुविधा/नागरीसुविधा व इतर योजनेतील काम करणेसाठी शासनाकडे नोंदणीकृत अधिकृत ठेकेदारांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रक रक्कम | १% इसारा रक्कम | ५%प्रतिपूर्वी सुरक्षा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी | कामपूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रा.पं.हद्दीतील रा.जि.प शाळा शौचालय दुरूस्ती | २००००० | २००० | | १०० | ३ महिने | |
| २. | अंजप प्रा.शाळा संरक्षण भिंत बांधणे/दुरूस्ती | १९५९८७ | १९६० | | १०० | ३ महिने | |
| ३. | ग्रा.पं.हद्दीतील अंगणवाडी केंद्र शौचालय दुरूस्ती | १०८३९५ | १०८४ | | १०० | ३ महिने | |
| ४. | नालधे आदिवासीवाडी नळपाणी पुरवठा करणे | ४९४१३ | ४९४ | | १०० | ३महिने | |
| ५. | सराईवाडी येथे आवश्यक नळपाणीपुरवठा योजना व नळ कनेक्शन देणे | १५८००० | १५८० | | १०० | ३महिने | |
| ६. | रामाचीवाडी येथे आवश्यक नळपाणीपुरवठा योजना व नळ कनेक्शन देणे | १८०३५९ | १८०४ | | १०० | ३महिने | |
| ७. | गुढवणवाडी येथे आवश्यक नळपाणीपुरवठा योजना व नळ कनेक्शन देणे | १८०३५९ | १८०४ | | १०० | ३महिने | |
| ८. | धारेवाडी नळपाणी पुरवठा योजना करणे | १८०३५९ | १८०४ | | १०० | ३महिने | |
| ९ | नालथे गांवातर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन देणे | १८०३५९ | १८०४ | | १०० | ३महिने | |
| १० | अंन्थ्रडनिड गावांतर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन देणे | १८०३५९ | १८०४ | | १०० | ३महिने | |
| ११ | ग्रा.पं.हद्दीतील राजिप शाळांना परिसर सुशोभिकरण करणे. | १०५००० | १०५० | | १०० | ३महिने | |
| १२ | ग्रा.पं.हद्दीतील राजिप शाळांना पाणीपुरवठ्याची सोय करणे | १००८०७ | १००८ | | १०० | ३महिने | |
| १३ | नालथेवाडी अंतर्गत रस्ते करणे | १६३३२३ | १६३३ | | १०० | ३महिने | |
| १४ | गुढवणवाडी अंतर्गत रस्ते करणे | १६३३२३ | १६३३ | | १०० | ३महिने | |
| १५ | धारेवाडी अंतर्गत रस्ते करणे | १६३३२३ | १६३३ | | १०० | ३महिने | |
| १६ | पिंगळेवाडी अंतर्गत रस्ते करणे | १६३३२३ | १६३३ | | १०० | ३महिने | |
| १७ | अंजप गावांतर्गत न.पा.पु.योजना | १००००० | १००० | | १०० | ३ महिने | |
| १८ | गुढवण अंगणवाडीकडे जाणारा रस्ता करणे | १०५८०९ | १०५८ | | १०० | ३ महिने | |
| १९ | अंन्थ्रडनिड अंतर्गत रस्ते करणे | १००००० | १००० | | १०० | ३ महिने | |
| २० | सुगवे अंतर्गत रस्ते करणे | १००००० | १००० | | १०० | ३ महिने | |

**अटी व शर्ती**

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२)पोस्टाने/प्रत्यक्ष पाठविलेल्या/सादर केलेल्या सिलबंद निविदा दि. / / ते दि. / / या कालावधीत कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालय बोरीवली येथे स्वीकारणेत येतील.
३)निविदा भरणाऱ्या ठेकेदारांने आपले रजिस्ट्रेशन व आवश्यक दाखले/प्रमाणपत्र सत्यप्रत केलेले असावेत.
४)प्राप्त निविदा दि. / /रोजी दुपारी =वाजता ग्रामपंचायत कार्यालय बोरीवली येथे उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
५)निविदा मंजूर केल्यावर ५०० रू. स्टम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
६)देयकातून शासन नियमाप्रमाणे GST, TDS आयकर व उपकाराची कपात केली जाईल.
७)पंचायत समिती कर्जत/जि.प.अलिबाग यांच्याकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे आहे. काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
८)ठेकेदार यांचे बॅंक खाते राष्ट्रीयकृत बॅंकेत असावेत व PFMS प्रणालीशी संलग्न असावे.
९)प्राप्त निविदा मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत बोरीवलीने राखून ठेवले आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

**ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली** | **सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत बोरीवली**

## महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in ph. No. (02145) 222167

**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ९१ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आंबेत बागमांडला रस्ता रामा-१०० कि.मी २६/१०० ते २७/००, ३१/०० ते ३८/०० व ४२/०० ते ४४/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका श्रीवर्धन,जिल्हा रायगड (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग. १०२ पूल केंद्रिय मार्ग) | ३१३५२९६१ | ३०९६७२११ | १५७००० | २२४०/- | १२ महिने | इतर |
| २ | आंबेत बागमांडला रस्ता कि.मी१३/०० मध्ये पुलाच्या पोचमार्गाचे बांधकाम करणे तालुका म्हसळा,(माणगांव) जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) | १३४२८६४३ | १२१३८६८६ | १३५००० | ११२०/- | ०६ महिने | वर्ग चार व वरील |
| ३ | विर टोळ आंबेत बागमांडला रस्त्यावरील रा.मा.१०० कि.मी.१७/८००, २३/००, २६/१००, २८/४००, २८/८०० मधील पूलाची पुर्नबांधणी करणे.(भाग-बांबेत ते पांगळोली) तालुका म्हसळा (माणगांव) जिल्हा रायगड. (५०५४ मार्ग व पूल,०३ राज्य मार्ग) | २३६९१३१७ | २२७८०२०५ | १५०००० | २२४०/- | १२ महिने | इतर |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| १ निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. १५/०२/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दि.०२/०३/२०२२ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ निविदा पुर्व बैठक (अ.क्र.१,चे कामा साठी) | मा.मुख्य अभियंता,(सा.बां) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २२/०२/२०२२ वेळ १२.०० वाजता |
| निविदा पुर्व बैठक (अ.क्र.३,चे कामासाठी) | मा.अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक २२/०२/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०४/०३/२०२२ वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दीपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी यावरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/६१४
दिनांक :- १०-०२-२०२२

सही/-
**(आर.के.बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## Bandhan Bank

रीजनल ऑफिसः नेताजी मार्ग, मिठाकली सिक्स रस्त्यांजवळ, एलिसब्रीज, अहमदाबाद–06. फोन: +91-79-26421671-75

### प्रतीकात्मक ताबा सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की सेक्युरिटायझेशन अँड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 या अधिनियमांतर्गत आणि कलम 13(12), सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचून त्याअन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन, प्राधिकृत अधिकाऱ्याने खालिल खात्यासमोर नमूद दिनांकेला मागणी नोटिस कर्जदार निर्गमित केली असून त्यात कथित सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत ती रक्कम परत करण्याची सूचना देण्यात आली होती. कर्जदारांनी कर्जाची परतफेड न केल्यामुळे याद्वारे कर्जदारांना, आणि सर्वसाधारण जनतेला नोटिस देण्यात येते की खाली सही करणाऱ्याने येथे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा, कथित ॲक्टचा सेक्शन 13(4) हा, कथित नियम 8 सह वाचला असता त्याखाली त्याला दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली दिलेल्या खात्यासमोर निर्देशित केलेल्या तारखेला घेतलेला आहे. याद्वारे कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला मालमत्तेसंबंधात कोणताही व्यवहार न करण्याचा सावधगिरीचा इशारा देण्यात येत आहे आणि मालमत्तेबाबत करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा रकम, व्याज, खर्च आणि शुल्कसाठी बंधन बँक लिमिटेडच्या प्रभारांच्या अधीन असेल. प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप–कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे/मोर्टगेजरचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | मालमत्तेचे वर्णन (सुरक्षित मालमत्ता) | मागणी नोटिसेची दिनांक | प्रतीकात्मक ताबा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकेला थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| श्री सुरेश क्रिष्ना भोपी<br>सौ. क्रिष्ना महादेव भोपी<br>गारंटर :<br>श्री संदेश पाटिल<br>412/1781 | फायनल प्लॉट घर क्र. 334, स्वतःची इमारत, घर क्र. 334, द्वारका क्रिष्ना घर क्र. 334, द्वारका क्रिष्ना घर, झेडपी स्कुल आणि मंदिरा जवळ, मु. जुई गाव, पो.–कामोठे, नवी मुंबई, रायगड कमोठे, पनवेल, जि.रायगढ, येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तर: बिल्डिंग, पूर्व: बिल्डिंग, पश्चिम: बिल्डिंग, दक्षिण: बिल्डिंग | 03.12.2021 | 09.02.2022 | रु.17,30,941/– |
| श्री भारत बजीरसिंग नेपाली<br>412/1641 | फायनल प्लॉट क्र. 05, फ्लेट क्र. 10, शिव कृपा बिल्डींग, मौजे शेदावली, आनंद नगर, खोपोली, ता. खालापुर, जि. रायगड येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व भूभाग आहेत आणि ही मालमत्ता खालीलप्रमाणे वेढलेली आहे: उत्तर: खुली जगा, पूर्व: बंगलो, पश्चिम: अंतर्गत रस्ता, दक्षिण: खुली जागा | 03.12.2021 | 09.02.2022 | रु.7,26,395/– |

**स्थळः रायगढ**
**तारीखः 15/02/2022**

**अधिकृत अधिकारी**
**बंधन बँक लिमिटेड**

# म ह त्त्वा चे

## मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**पनवेल :** पीर करमअली शहा दर्ग्याच्या उर्सानिमित्त पनवेल शहर शिवसेना वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना रायगड जिल्हा सल्लागार बबन पाटील व महानगर संघटक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या हस्ते करण्यात आले. सुश्रुषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये रक्त तपासणी, शुगर टेस्ट, सीबीसी, ईसीजी, पल्, एक्स रे, वजन तपासणी यासारख्या तपासण्या करण्यात आल्या. या आरोग्य शिबिरात ५००हून अधिक लोकांनी लाभ घेतला.

## नांदगाव विद्यालयात लसीकरण

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र पाली यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. नांदगाव विद्यालयातील १५ ते १८ वर्षे वयोगटातील ८९ विद्यार्थ्यांनी कोव्हॅक्सिन लस घेतली. लसीकरणास प्रा. बाळासाहेब साळुंखे व शाळेतील शिक्षक वृंदाचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. प्राथमिक आरोग्य केंद्र पालीच्या वतीने औषध निर्माता वैष्णवी मुळे, परिचारिका पायल कोलपकर, कर्मचारी रवी चलवाड, ज्ञानेश्वर जगताप हे उपस्थित होते.

# उंडरेवाडीच्या विकासाचा मार्ग खडतरच

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होऊन गेली असतानाही माणगाव तालुक्यातील खर्डी खुर्द, नेराव, सुतारवाडी ते उंडरेवाडीत विकासाचा सूर्य उगवलाच नाही, त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही ग्रामस्थांचा विकासाचा मार्ग खडतरच राहिला आहे. रायगड जिल्ह्यात या गावाला दोन तालुके, तीन ग्रामपंचायती लाभल्या असून, ही गावे विकासापासून उपेक्षित राहिली आहेत. याकडे लोकप्रतिनिधी व शासनांनी अक्षम्य दुर्लक्ष चालवले आहे. त्यामुळे उंडरे वाडीत स्वातंत्र्याच्या सूर्याची किरणे विकसाअभावी तोकडीच पडली आहेत.

या गावांना ७५ वर्षांत अजून साधा रस्ताही मिळाला नाही. दुरून डबक्यातील पाणी आणून महिलांच्या डोळ्यात अश्रू आजही उभे आहेत.



त्यामुळे खरच आम्हाला स्वातंत्र्य मिळाले का? असा प्रांजळ सवाल येथील ग्रामस्थांतून बोलताना उपस्थित होत आहे.

**|| चांगल्या रस्त्यापासून ग्रामस्थ वंचित**

**|| पिण्याच्या पाण्यासाठी महिलांची वणवण**

> **खर्डी खुर्द, नेराव, सुतारवाडी ते उंडरेवाडी या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, अद्याप या रस्त्याची समस्या सुटली नसल्याने येथील ग्रामस्थांचे पुरते हाल होत आहेत. हा रस्ता करण्याबाबत रायगड किल्ला प्राधिकरण समितीचे अध्यक्ष छत्रपती संभाजी राजे, खा. सुनील तटकरे, आ. भरत गोगावले यांना निवेदने दिली होती.**
>
> **– पंकज तांबे**

रायगड जिल्ह्यातील माणगाव आणि महाड तालुक्यातील हद्दीवरील या गावाची ही करुण कहाणी आहे. जिल्हा एक, तालुके दोन, ग्रामपंचायती तीन असूनही या गावापर्यंत विकासाची किरणे पोहोचलीच नाहीत. माणगाव तालुक्यातील कवीळवहाळ, पळसगाव या दोन ग्रामपंचायती तर महाड तालुक्यातील नेराव ग्रामपंचायत हद्दीत उंडरेवाडी, उंबरी व पळसगाव धनगरवाडी येत असून, उंबरी व धनगरवाडी येथील काही घरे महाड तालुक्याच्या हद्दीत येतात. तीनही गावांची मिळून सुमारे सहाशे वस्ती आहे. गावापासून काही अंतरावर असणाऱ्या तलावातून महिला हंड्याने पाणी आणतात. त्यामुळे पिढ्यान्पिढ्याचे चालत आलेले पाण्याचे ओझे आजही कायम डोक्यावर आहे. त्यामुळे महिलांच्या डोळ्यात अश्रू उभारले आहेत.

# पुलवामा हल्ल्यातील शहीद जवानांना वाहिली श्रद्धांजली



**। पेण । वार्ताहर ।**

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमधील पुलवामामध्ये देशाच्या जवानांवर झालेल्या भ्याड हल्ल्यात जे जवान शहीद झाले, त्यांना सह्याद्री प्रतिष्ठान पेण व गांधी वाचनालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने श्रद्धांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा गांधी वाचनालय येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त सैनिक सुरेंद्र ठाकूर हे उपस्थित होते.

सुरुवातीस या कार्यक्रमासाठी जमलेल्या पेणकरांनी एक मिनीट उभे राहून शहिदांना श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त सैनिक सुरेंद्र ठाकूर, नंदा म्हात्रे, सपना पाटील, ॲड. मंगेश नेने, रोशन टेमघरे, समीर म्हात्रे, संतोष पाटील उपस्थित होते. त्यांनी शहीद जवानांना शब्दसुमनांनी श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमासाठी महात्मा गांधी वाचनालयाचे अध्यक्ष अरविंद वनगे आवर्जून उपस्थित होते.

# अलिबागमध्ये ‘बीच क्लीनअप’ मोहीम

## प्रियांका, सुरभी या तरुणींचा पुढाकार



**। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।**

आपण अलिबागकर निसर्गाच्या सान्निध्यात राहिल्याबद्दल जितके कृतज्ञ आहोत, तितकेच हे क्षेत्र स्वच्छ ठेवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. या विचारातून प्रियांका सावंत आणि सुरभी मोरे या दोन तरुणींच्या नेतृत्वाखाली अलिबागमध्ये बीच क्लीनअप मोहीम शनिवारी (दि. १२) रोजी सकाळी राबवली. आपण ज्या वातावरणात श्वास घेतो आणि राहतो, ते निरोगी आणि स्वच्छ असायला हवे, हा मानस घेऊन ही स्वच्छता मोहीम राबल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे अलिबागमध्ये अजून अशा मोहिमा राबवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. या मोहिमेत अलिबागचे तरुण पवन एन. घरत, श्रेया ठाकूर आणि मृणाल वाकडीकर, तसेच कलाकार प्रीती थळे (शाईपेन आर्ट), शिक्षिका आणि करिअर समुपदेशक धनश्री खानविलकर, इन्स्ट्रुमेंट इंजिनिअर अनिकेत कदम, इव्हेंट मॅनेजर आणि प्रोडक्ट इंजिनीअर आकाश राजदेकर यांचाही सहभाग होता. ज्येष्ठ वकील जयेश जोशी, सचिन बारवेकर आणि अलिबागमधील काही रहिवासी या साफसफाईमध्ये सहभागी झाले होते.

# ‘पथदिवे बसवा’

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्यावर वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ताण येऊन सातत्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागायचा. या मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळावी यासाठी सहाण बायपास रस्त्याची निर्मिती केली असून, ती वाहनचालकांसाठी फायद्याची ठरत आहे. परंतु, रस्त्याची निर्मिती झाल्यापासून या ठिकाणी पथदिवे बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी या रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. तरी या गोष्टीचा गांभीर्याने विचार करुन संबंधित विभागाने या रस्त्यावर पथदिवे बसवावेत, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# पनवेल येथे हळदीकुंकू समारंभ



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल जिल्हा महिला काँग्रेस व अनुसूचित जाती महिला विभाग यांच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व महिलांना वाण म्हणून भेटवस्तू देण्यात आल्या. या कार्यक्रमास आर.सी. घरत व लतीफ शेख यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. तसेच पनवेल तालुका अध्यक्ष नंदराज मुंगाजी, महिला तालुका अध्यक्षा सपना मुंगाजी, अंजली पालकर, प्रेमा अपाजी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन पनवेल जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा निर्मला म्हात्रे व अनुसूचित जाती पनवेल महिला अध्यक्षा माया अहिरे यांनी केले होते.

# धडकेत दोघांचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकलची धडक लागून दोघा जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघाती घटनांची नोंद पोलीस ठाण्यात झाली असून, पोलीस मृतांच्या वारसांचा शोध घेत आहेत.

पहिल्या घटनेत कोपरखैराणे ते तुर्भे रेल्वे स्टेशनदरम्यान कि.मी.नं. ४५/३० जवळ लोकल गाडीची धडक लागून एका ५५ वर्षीय अज्ञात हिंदू पुरुषाचा मृत्यू झाला आहे. मृताची उंची ५ फुट ६ इंच, रंग-निमगोरा चेहरा उभट, नाक सरळ, डोकीचे केस पांढरे टक्कल पडलेले आहे व अंगात निळसर रंगाचा त्यावर मारून रंगाचे पट्टे असलेला फुल शर्ट व नेसणीस काळ्या रंगाची फुल पॅन्ट आहे. पोलिस उपनिरीक्षक ए.सी.आढाव हे तपासी अंमलदार आहेत.

दुसऱ्या अपघाती घटनेत मानखुर्द ते वाशी रेल्वे स्टेशन कि.मी. नं.२२/०६ जवळ लोकलची धडक लागून एका ५० वर्षीय अज्ञात हिंदू पुरुषाचा मृत्यू झाला आहे. उंची ५ फुट ३ इंच, अंगाने मध्यम, रंगाने काळासावळा, चेहरा गोल, नाक सरळ, केस काळे, दाढी साधारण बारीक, मिशी तलवार कट असे त्याचे वर्णन असून, त्याने अंगात हिरवे राखाडी पांढऱ्या रंगाचे जर्किन, आत पिवळसर रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व नेसणीस काळे रंगाची ट्रक पॅन्ट असा पोशाख परिधान केला आहे.

# ‘सह्याद्री’च्या मावळ्यांची रत्नदुर्गावर स्वच्छता



**। पेण । वार्ताहर ।**

दुर्गसंवर्धन मोहिमेंतर्गत सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने रविवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी रत्नदुर्ग किल्ल्यावर जाऊन गडाची स्वच्छता व परिसराची साफसफाई करण्यात आली. या मोहिमेत ६० दुर्गसेवक सहभागी झाले होते. त्यांनी पाण्याचे टाके क्रमांक २ मधील ५ फूट माती बाहेर काढली. तसेच गड माथा, तटबंदी, बुरुज यांच्यावरील गवत, झाडे झुडपे साफ केली. पायरी मार्ग साफ केला.

या मोहिमेदरम्यान सह्याद्री प्रतिष्ठान पेण, मुंबई विभाग, तळा विभाग, पनवेल विभाग, अलिबाग विभाग, खालापूर विभाग येथून दुर्गसेवक सहभागी झाले होते.

# द्रुतगती मार्गावर कंटेनरला आग

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रविवारी मध्यरात्री एका कंटेनरला आग लागल्याची दुर्घटना घडली. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या कंटेनरला माडप गावानजीक अचानक आग लागली. याची माहिती मिळताच पोलीस आणि आयआरबीच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. कंटनेरने रस्त्याच्या मध्येच पेट घेतल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला होता. त्यामुळे सुरुवातीला कंटेनर बाजूला सारून वाहतूक सुरळीत करण्यात आली. त्यानंतर कंटेनरला लागलेली आग विझवण्यात आली.

कंटेनरमधील वस्तूंनी पेट घेतल्यामुळे आग लागल्याचे समजते. या आगीवर नियंत्रण आणल्यानंतर सदर कंटेनर खालापूर टोलनाक्याजवळ आणला असता धुमसत असलेल्या आगीने पुन्हा पेट घेतला. यावेळी खोपोली फायर ब्रिगेडच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. कंटेनरमधील धुमसत असलेल्या वस्तू जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आल्या.

# अनधिकृत होर्डिंग्जचा ‘मेट्रो रेल्वे’ला धोका

## नागरिकांमध्ये नाराजी

**। पनवेल । वार्ताहर ।**

शीघ्र कृती दलसमोरील सिग्नल आणि भुयारी मार्गाच्या प्रवेशद्वारासमोर काही दादा मंडळीकडून लावण्यात आलेले अनधिकृत होर्डिंग्ज मेट्रो रेल्वे मार्गावर असल्यामुळे ‘मेट्रो रेल्वे’ला अडचणीचे ठरत असून, पनवेल महापालिका प्रशासनाने सदर होर्डिंग्ज तात्काळ हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

तळोजा वसाहतीत मोठ्या प्रमाणात खाजगी बिल्डरांचे इमारत बांधकाम प्रकल्प सुरु आहेत. घराच्या जाहिरातीसाठी काही मंडळींनी शीघ्र कृती दल, तळोजा वसाहत भुयारी मार्ग आणि फेज दोन पेंधर मेट्रो स्थानकालगत नदीसमोरील रस्त्यावर काहींनी लोखंडी होर्डिंग्ज उभारले असून, त्यावर परिसरात सुरु असलेल्या काही बिल्डरांच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या जाहिराती झळकत आहेत. काही दादा मंडळीने सदर अनधिकृत होर्डिंग्ज उभारुन परस्पर होर्डिंग्जवर लावण्यात येणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांकडून मोठ्या रक्कम गोळा करीत असल्याचे सांगितले जाते.

विशेषतः मेट्रो रेल्वे मार्गालगत लावण्यात आलेल्या होर्डिंग्जमुळे मेट्रो रेल्वे चालकाचे लक्ष विचलित होऊ शकते. सदर अनधिकृत होर्डिंग्जवर पनवेल महापालिका आणि सिडकोकाडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्यामुळे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. दरम्यान, मेट्रो रेल्वे मार्गात जाहिरात लावणे योग्य नसून, या विषयी पोलीस प्रशासनाकडे पोलीस बंदोबस्तची मागणी करुन लवकरच सदर अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई केली जाणार आहे, असे पनवेल महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

# न्यायालय परिसराची वाहतूक कोंडीतून सुटका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शहरातील न्यायालयाच्या परिसरात चारचाकी वाहनांना सोमवार ते शुक्रवार म्हणजेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ‘नो पार्किंग’ बाबत आणि दुचाकी वाहनांना ‘सम विषम पार्किंग’बाबतची अधिसूचना पनवेल शहर वाहतूक विभागाच्यावतीने घोषित करण्यात आली होती. न्यायालयासमोरील परिसरात कार्यालयीन वेळेत चारचाकी वाहने पार्किंग केल्यास व दुचाकीस्वारांनी सम-विषम पद्धतीने वाहने पार्किंग न केल्यास कारवाईस सामोरे जावे लागेल, असे आवाहनही वाहतूक विभागाकडून करण्यात आले होते.



त्यानुसार वाहतूक विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. अखेर वाहतूक विभागाच्या पुढाकाराने

**पनवेल शहर वाहतूक विभागाच्या प्रयत्नांना यश**

न्यायालय परिसरातील वाहतूक कोंडी फुटली असून, न्यायालय परिसराने वाहतूक कोंडीतून आता मोकळा श्वास घेतला आहे. यामुळे नागरिक वाहतूक विभागाचे आभार मानत आहेत.

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या माध्यमातून महापालिकेच्यावतीने याठिकाणी ‘नो पार्किंग’चे फलकही लावण्यात आले आहेत. तरीदेखील न्यायालयात येणारे काही नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्किंग करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पनवेल शहर वाहतूक विभागाने अशा बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. तर काही वाहनचालकांनी प्रशासनाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत न्यायालय परिसरात वाहने पार्किंग करणे बंद केले. त्यामुळे याठिकाणची वाहतूक कोंडी फुटली असून, नागरिकही येथून विनाअडथळा ये-जा करीत आहेत.

पनवेल शहरातील न्यायालय परिसरात आजूबाजूला खासगी हॉस्पिटल, पोलीस उपायुक्त कार्यालय, तालुका पोलीस ठाणे यासह इतरही महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत. तर न्यायालयाच्या समोरील बाजूस निलपार्क, शीतल, गुरुकुल व पवन अशा चार रहिवासी सोसायट्यादेखील आहेत. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर वाहतूक विभागाच्या पुढाकाराने न्यायालय परिसर वाहतूक कोंडीमुक्त झाल्याने नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

# अलिबागच्या कलाकारांचा आगरी-कोळी ठसका

# पुष्पा-श्रीवल्लीची कोळीस्टाईल लव्हस्टोरी

**सायली पाटील**

**। अलिबाग ।**

पुष्पा चित्रपटाने सर्वांनाच वेड लावले आहे. आणि, या चित्रपटातील गाण्यांनी तर प्रत्येकाच्या मनावर जादू केली आहे. ‘पुष्पा’मधीलच सुप्रसिद्ध झालेले ‘श्रीवल्ली’ हे गाणं आता कोळी व्हर्जनमध्ये आलं असून, ते अलिबागच्या कलाकारांनी बनविले आहे. त्या कोळी श्रीवल्लीचे १४ फेब्रुवारी रोजी ‘द मिरर एंटरटेंमेंट’ या यूट्युब चॅनलवर पोस्टर व ट्रेलर रिलीज झाले.

कोळी बांधव, कोळी संस्कृती, कोळी परंपरेने नटलेले अलिबाग ही अलिबागकरांची शान आहे. त्यामुळे अलिबागची शान असणाऱ्या या कोळी स्टाईललाच श्रीवल्लीचे व्हर्जन बनवत पुष्पा-श्रीवल्लीची कोळी स्टाईल लव्हस्टोरी आपल्याला पाहायला मिळणार आहे.

गेल्या ३-४ दिवसांपासून जे श्रीवल्ली कोळी व्हर्जन व्हायरल झाले आहे, त्या कोळी व्हर्जनचा ऑफिशिअल व्हिडिओ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तसेच या गाण्यात कायमच कलाक्षेत्र गाजवत असणाऱ्या अलिबागच्या सर्व कलाकारांनी नेहमीप्रमाणेच उत्तम अशी कामगिरी करत अतिशय सुंदर अशा पद्धतीने भूमिका साकारल्या आहेत.

या गाण्याचे दिग्दर्शन सागर यादव यांनी केले असून ही संकल्पना कलाकार प्रकाश सप्रे यांची आहे. यामध्ये प्रमुख भूमिका अंकिता राऊत, प्रकाश सप्रे, संदीप वाटवे, सचिन शिंदे यांनी साकारल्या आहेत. श्रीवल्लीच्या कोळी व्हर्जनची गीत रचना मनिष अनसुरकर यांनी केली असून त्याला नवीन मोरया यांनी स्वरबद्ध केले आहे. तसेच या गाण्याचे छायाचित्रण सुनित गुरव, संकलन विशाल गायकवाड, नृत्यदिग्दर्शन- आतिश मोहिते, मेकअप- मृणाली कांबळे, रश्मी पाटील, सहाय्यक छायाचित्रण- सिद्धांत पाटील व शुभम पाटील यांनी केले आहे.

या गाण्यात पुष्पा-श्रीवल्लीची लव्हस्टोरी कोळी स्टाईलमध्ये दाखवण्यात आली असून, सोबतच कॉमेडीचाही तितकाच समावेश केला आहे.

## एका दिवसातच हजारोंची गाण्याला पसंती



> **इतर भाषांमधले आलेले व्हर्जन्स पाहून एक अनोखा गोडवा असणाऱ्या आपल्या आगरी-कोळी भाषेतीलही श्रीवल्लीचे व्हर्जन यायला हवे, असे वाटत होते. त्यामुळे एक वेगळी संकल्पना घेऊन अलिबागकरांची शान असणाऱ्या कोळी स्टाईलमध्ये हे व्हर्जन करण्याचा प्रयत्न केला आहे.**
>
> **– प्रकाश सप्रे, कलाकार**

> **पुष्पा चित्रपटातील श्रीवल्ली या गाण्याने सर्वांनाच प्रचंड वेड लावले असून, बऱ्याच भाषांमधले श्रीवल्लीचे व्हर्जन्स आले आहेत. अगदी इंग्रजी भाषेतही हल्लीच व्हर्जन दाखल झाले आहे. पण, त्या सर्वांवर कडी करणारे एक धमाल आगरी-कोळी बोलीचा ठसका असणारे व्हर्जन आपल्या अलिबागच्या कलावंतांनी आणले आहे. सर्वत्र हे कोळी व्हर्जन खूप व्हायरल होत आहे. आपल्याच मातीतील अलिबागकरांची शान असणाऱ्या कोळी भाषेचा गोडवा लोकांसमोर आगरी-कोळी व्हर्जनमधून आणण्याचा प्रयत्न केला आहे.**
>
> **– मनिष अनसुरकर, गीतकार**

## संपादकीय

# घोटाळ्यांच्या देशा

आर्थिक घोटाळे हे काही आपल्या देशाला नवीन नाहीत. त्यात सामील असलेल्या बँका आणि कोणत्या कालखंडात किती घोटाळे घडले हे पाहिल्यास मात्र काही नवीन गोष्टी पुढे येतात. देशातील उद्योजक, जनता यांना न्याय्य पतपुरवठा करण्याच्या हेतूने आधी खाजगी असलेल्या बँकांना सरकारने ताब्यात घेतले. तसेच, जागतिकीकरणाच्या निमित्ताने उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण स्वीकारून आता तीन दशके लोटली तरी या काही बँकांचा सरकारीपणा कायम आहे. त्याला अनेक कारणे आहेत, तुर्तास आता झालेल्या एका नवीन घोटाळ्याविषयी चर्चा करायची असल्याने तो विषय बाजूला ठेवायला हवा. अचानक तब्बल २२ हजार ८४२ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची बातमी बाहेर आली असून त्याची सर्व स्तरावर देशभरात चर्चा सुरू आहे. मुंबईत कार्यालय नोंदणी असलेल्या एबीजी शिपयार्ड लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ऋषी कमलेश अग्रवाल याने हा एवढा मोठा घोटाळा केल्याचे वृत्त प्रसारीत झाले असून त्यानंतर मुंबईतील आपला कारभार सोडून हे कंपनीचे सर्वेसर्वा गायब झालेले आहेत. ते मुंबईतून गुजरातमध्ये पळून गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मुंबईत राहिलो तर धोका आहे आणि गुजरातमध्ये गेलो तर सुरक्षित राहू असे त्यांचे मत कशाने बनले असावे, हा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. तेथे कदाचित भामट्या उद्योजकांना वेगळे कायदे लागू होत असावेत. असो. टिप्पणी करण्यापूर्वी या खटल्याचा संपूर्ण तपशील जाणून घ्यायला हवा. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, भारतीय स्टेट बँकेच्या नेतृत्वाखालील बँकांच्या संघाची ही जवळपास २३ हजार कोटी रुपयांनी फसवणूक करण्यात आली असून या संघात एकंदर २८ बँका आणि वित्तीय संस्थांचा समावेश आहे. म्हणजे या कंपनीला एक दोन नव्हे तर तब्बल २८ बँका व वित्तीय संस्थांनी कर्ज दिले होते. त्यात विविध वित्तीय संस्था तथा बँकांचा कर्जाचा हिस्सा वेगवेगळा होता. त्यात जवळपास अडीच हजार कोटींचा हिस्सा स्टेट बँकेचा होता, असे समजते. हा एका अधिकाऱ्याने सांगितल्यानुसार, गुन्हा शाखेने हाताळलेला आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रकार आहे. या प्रकरणी गुन्ह्याची नोंदणी सीबीआयकडे नोंदली गेलेली आहे. त्यात २०१२ ते २०१७ या कालावधीत सदर कंपनी मालकांनी संगनमताने हा गैरप्रकार केल्याचे नमूद असून निधी बेकायदा इतरत्र वळवणे, निधीचा गैरवापर करणे आणि वित्तीय संस्था तथा अन्य हिस्सेदारांप्रती विश्वासघात करण्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. हा घोटाळा आता प्रकाशात आला असला तरी या घोटाळ्याच्या संबंधात बँकेने सर्वप्रथम आठ नोव्हेंबर २०१९ रोजी तक्रार नोंदवली असली तरी तब्बल दोन वर्षांनी कारवाई होत आहे. त्यावर सीबीआयने त्याबाबत चार महिन्यांनी १२ मार्च २०२० ला स्पष्टीकरण देण्यास सांगितले होते. त्यातून काही निष्पन्न न झाल्याने त्याच वर्षी ऑगस्टमध्ये बँकेने नव्याने तक्रार नोंदवली. त्याची सुमारे दीड वर्षे पडताळणी केल्यानंतर सीबीआयने कार्यवाही करत अखेर गेल्या सोमवारी सात फेब्रुवारी २०२२ रोजी एफआयआर दाखल केला. सर्वसामान्य भारतीयांना छळणारी आणि घोटाळेबाजांना रेशमी पायघड्या अंथरणारी बँक म्हणजे एसबीआय आणि अन्य सरकारी बँका हे समीकरण जनतेच्या मनात पक्के बसले आहे. सर्वसामान्य जनतेला हिडीस फिडीस करणे, साधे पासबुक भरून देण्यासाठी अनेक खेटे घालायला लावणे हे त्यांचे मुख्य काम. मागच्या दाराने मात्र हजारों कोटींचा भ्रष्टाचार असा याचा कारभार आहे. लोकांनी दोन हप्ते बुडवले तर त्याला कोणत्या प्रकारच्या मानसिक छळाला सामोरे जावे लागते हे त्यातून गेलेल्यांनाच माहिती. तसेच, अजून त्या बिचाऱ्याची दोन चार महिने परिस्थिती सुधारली नाही तर त्याला आपण सरकारी बँकेशी व्यवहार केला आणि कायद्याच्या राज्यात राहात आहोत की येथे अंडरवर्ल्डचे राज्य आहे, असा अनुभव येण्यासारखी परिस्थिती त्यावर आणली जाते. आणि हे केवळ काही लाखांच्या कर्जासाठी जे अनेकदा गृहनिर्माण विषयक असेल तर ती मालमत्ता कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असते आणि ती बँकेकडे तारण असते. तरीही असा अनुभव येतो. मोठे घोटाळेबाज अलिकडच्या काळात वाढले कारण त्याला सरकारचेच अभय आहे असे दिसते. बुडीत कर्जाची सर्वाधिक रक्कम याच सरकारने माफ केली हे विसरून चालणार नाही.

# अधिकार आणि न्यायपालिका



प्रा. अविनाश कोल्हे



विधिमंडळाचे मागच्या महिन्यांत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातल्या बारा आमदारांचं निलंबन रद्द केलं. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा आदर करत भाजपाच्या बारा आमदारांचं निलंबन मागे घेण्यात आले असून त्यांना त्यांचे सर्वाधिकार देण्यात आले आहेत. हे जरी योग्य झालं असलं तरी विधिमंडळात न्यायपालिकेचा हस्तक्षेप कितपत योग्य आहे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे, याबद्दल दुमत नसावं. विधिमंडळ आणि न्यायपालिका यांच्या अधिकारांबाबत राष्ट्रपतींनी राज्यघटनेच्या अनुच्छेद १४३ नुसार परामर्श घ्यावा, अशी विनंती विधिमंडळाच्या पीठासन अधिकाऱ्यांनी शुक्रवार, अकरा फेब्रुवारी रोजी मुंबईत राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची भेट घेऊन केली. एकूणातच ही गंभीर बाब आहे. विधान परिषदेचे अध्यक्ष रामराजे नाईक निंबाळकर, उपाध्यक्ष डॉ.निलम गोंहे आणि विधानसभेचे उपसभापती नरहरी झिरवळ यांनी मुंबईत दौऱ्यावर असलेले राष्ट्रपती कोविंद यांची भेट घेतली.

सर्वोच्च न्यायालयाने २८ जानेवारी २०२२ रोजी दिलेल्या निकालानुसार भाजपाच्या बारा आमदारांचे निलंबन घटनाबाहय होते. या सभासदांचे निलंबन अधिवेशन काळापुरतेच करता येते, असाही न्यायालयाचा निर्णय होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर बारा आमदारांच्या निलंबनाबाबत पिठासन अधिकारी निर्णय घेतील, अशी राज्य सरकारची भूमिका होती. न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करत आम्ही निलंबन मागे घेत आहोत, असे पिठासन अधिकाऱ्यांनी जाहीर केले. मात्र न्यायालयाच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील विधिमंडळांच्या सार्वभौम सभागृहाच्या अधिकारांचा संकोच होत आहे. राज्यघटनेला अभिप्रेत असलेले तीन स्तंभामधील सत्ता संतुलन आणि सत्ता नियंत्रण हे तत्व बाधित झाले आहे. या निर्णयामुळे राज्यघटनेतील अनुच्छेद १४३ नुसार न्यायालयाने दिलेल्या या निर्णयासंदर्भात परामर्श घ्यावा अशी विनंती राष्ट्रपतींना केलेली आहे.

या निर्णयामुळे राज्यघटनेतील तरतुदी आणि त्यांची प्रत्यक्षात होत असलेली अंमलबजावणी, याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. विधानसभेत गदारोळ आणि सभापतींच्या दालनात गैरवर्तन केल्याबद्दल भाजपाच्या बारा आमदारांना निलंबित केले होते. हे निलंबन वर्षासाठी होते. वर्षभराच्या निलंबनामुळे, त्यांच्या विधानसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व विधानसभेत होऊ शकणार नव्हते. राज्यघटनेच्या अनुच्छेद १९० (४) नुसार विधानसभेत कोणताही मतदारसंघ साठ दिवसांपेक्षा अधिक काळ प्रतिनिधीत्वाशिवाय राहू शकत नाही. समजा तसं झालं तर ती जागा रिक्त असल्याचे समजले जाते आणि नव्याने निवडणूक घ्यावी लागते. पण या प्रकरणात आमदारांचे निलंबन झाले होते. म्हणून नव्याने निवडणूक घेता येत नव्हती. अशा स्थितीत हे निलंबन म्हणजे त्या मतदारसंघातील जनतेला दिलेली शिक्षा आहे, असा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने काढला. हा निर्णय देणाऱ्या तीन न्यायमुर्तींच्या खंडपीठात न्यायमुर्ती ए. एम. खानविलकर, न्यायमुर्ती महेश्वरी आणि न्यायमुर्ती रविकुमार होते. या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार सभागृहाच्या एका अधिवेशनापेक्षा जास्त काळाचे निलंबन सभागृहाच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर आहे. एवढेच नव्हे तर असा निर्णय असंवैधानिक आहे, अशा निर्णयांमुळे चुकीचे पायंडे पडू शकतात, असेही सर्वोच्च न्यायालय स्पष्ट शब्दांत नमुद करते.

जगभरच्या लोकशाही शासनव्यवस्थेत 'संसद', 'मंत्रीमंडळ' आणि 'न्यायपालिका' हे तीन महत्वाचे स्तंभ असल्याचे मानलेले आहे. राज्यघटनेत या तिन्ही स्तंभांचे अधिकार आणि मर्यादा स्पष्ट शब्दांत नमुद केलेल्या आहेत. असं असलं तरी सर्वच बाबी लिहून ठेवता येणे शक्य नाही. अनेक गोष्टी नंतर समोर येतात. त्यातलीच एक म्हणजे सध्या चर्चेत असलेले बारा आमदारांचे निलंबन. लोकशाहीत 'संसद' जरी सर्वोच्च स्थानी असली तरी तिच्या अधिकारांची छाननी करण्याचा अधिकार 'न्यायपालिकेला' आहे, हेही तितकेच खरे.

राज्यघटनेतील अनेक तरतुदी आदर्श स्थिती व्यक्त करणाऱ्या आहेत, असा आपला आजवरचा अनुभव आहे. प्रत्यक्षात लोकप्रतिनिधी अनेक प्रसंगी सभागृहात गैरवर्तन करतात, हे आपण नेहमी बघत असतो. सभागृहाचे कामकाज सुरूळीत व्हावे, ही जबाबदारी पिठासन अधिकाऱ्यांची असते आणि यासाठी त्यांना खास अधिकारसुद्धा दिलेले असतात. आदर्श स्थितीत हे अधिकार वापरण्याची वेळ येऊ नये. पण तसं होतांना दिसत नाही. म्हणून मग सभापती/अध्यक्षांना सभासदांना वेगवेगळया प्रकारची शिक्षा द्यावी लागते. मात्र ही शिक्षासुद्धा कायद्याच्या चौकटीतच असली पाहिजे. विद्यमान सभापतींनी भाजपाच्या बारा आमदारांनी दिलेली वर्षभराच्या निलंबनाची शिक्षा घटनेतील तरतुदींच्या विरोधात जाणारी होती. म्हणून न्यायपालिकेला हस्तक्षेप करत निलंबन रद्द करावे लागले.

लोकशाही शासनव्यवस्थेत, त्यातही भारतासारख्या विकसनशील लोकशाही व्यवस्थेत 'न्यायपालिका' एका बाजूला तर संसद आणि मंत्रीमंडळ दुसऱ्या बाजूला, असे अनेकदा जाहीर वाद होत असतात. या संदर्भात चटकन आठवणारा आणि ऐतिहासिक ठरलेला खटला म्हणजे 'केशव सिंग विरूद्ध विधानसभा सभापती, उत्तर प्रदेश' हा खटला जो १९६५ साली गाजला होता. या खटल्याचे तपशील समोर ठेवणे गरजेचे आहे. केशवसिंग या गृहस्थाने एका पत्रकाद्वारे नरसिंग नारायण पांडे या आमदारावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. केशवसिंगने हे पत्रक उच्च न्यायालयाच्या आणि विधानसभेच्या आवारात वाटले. नरसिंग पांडेंनी तक्रार दाखल केली की यामुळे लोकप्रतिनिधींच्या खास अधिकारांचा भंग झाला आहे. सभापतींनी केशवसिंगला सभागृहासमोर उपस्थित राहण्याचा आदेश दिला. तो उपस्थित न राहिल्यामुळे सभागृहाने त्याला सात दिवसांच्या कारावासाची शिक्षा दिली. त्यानुसार केशवसिंगला अटक झाली आणि त्याने सहा दिवस तुरूंगात काढले. नंतर मात्र त्याच्या एका मित्राने उच्च न्यायालयात हेबीअस कॉर्पची तक्रार दाखल केली आणि एका वेगळ्या नाट्याची सुरूवात झाली.

उच्च न्यायालयाने त्याच दिवशी केशवसिंगाची जामीनीवर सुटका करण्याचा हुकूम दिला. ज्या दिवशी केशवसिंगांनी हा अर्ज उच्च न्यायालयात दाखल केला त्यादिवशीपर्यंत त्यांची सात पैकी सहा दिवस शिक्षा भोगून झाली होती. शिक्षेचा एक दिवस बाकी असतांना उच्च न्यायालयाने त्याची जामिनावर सुटका केली. केशवसिंगच्या वतीने वकीलांनी न्यायालयाला सांगितले की सभागृहाला अशा प्रकारे शिक्षा देण्याचा अधिकार नाही. अशा प्रकारे केशवसिंगला तुरूंगात टाकून कलम २२(२) चा भंग झालेला आहे. यातून पुढे 'न्यायपालिका विरूद्ध विधीमंडळ' यांच्यात संघर्ष उभा राहिला. उच्च न्यायालयाने अशा व्यक्तीची सूटका केली आहे ज्याला आम्ही शिक्षा दिली आहे असं म्हणत विधानसभेने 'हा निर्णय देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या दोन्ही न्यायमुर्तींनी अटक करा' असा ठराव संमत केला. या टप्प्यावर केशवसिंग ही व्यक्ती मागे पडली आणि 'न्यायपालिका विरूद्ध विधिमंडळ' असा संघर्ष उभा राहिला. ठराव झाल्याच्या दुसरे दिवशी दोन न्यायमुर्तीनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की या ठरावामुळे घटनेच्या कलम २११ चा भंग झाला. कलम २११ नुसार न्यायमुर्तींच्या कामाची चर्चा विधिमंडळात करता येत नाही. दोन न्यायमुर्तीच्या याचिकेची सुनावणी उच्च न्यायालयाच्या सर्व म्हणजे २२ न्यायमुर्तीच्या पिठापुढे झाली. या पिठाने दोन न्यायमुर्तीची याचिका दाखल केली आणि विधिमंडळाच्या ठरावाला स्थगिती दिली. या अभूतपूर्व तिढ्यातून कसाबसा मार्ग काढला. सभापतींनी ठरावाद्वारे 'अटक' न म्हणता न्यायमुर्तींनी सभागृहासमोर येऊन स्वतःची भूमिका मांडावी, असा मार्ग काढला.

पण मूळात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सर्वांनी खबरदारी घेतली पाहिजे. लोकशाही ही शासनव्यवस्था सर्व संबंधितांकडून जबाबदारीने वागण्याची अपेक्षा ठेवते. जेव्हा एखादा स्तंभ त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर पाऊल टाकतो तेव्हा न्यायपालिकेला हस्तक्षेप करावा लागतो. अशा कडवट घटना टाळायच्या असतील (आणि त्या टाळल्याच पाहिजेत) तर प्रत्येक स्तंभाने आपापल्या अधिकारांनुसार वागले पाहिजे. कोणत्याही शासनव्यवस्थेत शासनाच्या विविध विभागांमध्ये सतत वादविवाद होणे स्वाभाविक आहे. मात्र हे वाद सामोपचाराने मिटवले पाहिजेत. संसद मंत्रीमंडळ आणि न्यायपालिका या तिन्ही स्तंभांनी जर जबाबदारीची जाणिव ठेवून वागणूक ठेवली तर असे कटू प्रसंग टाळणे सहज शक्य आहे. लोकप्रतिनिधींनी जर सभागृहात योग्य वर्तन केले शांतपणे चर्चेत भाग घेतला तर पिठासन अधिकाऱ्यांना त्यांना निलंबित करण्याची वेळ येणार नाही. आज भारतातील लोकप्रतिनिधींच्या सभागृहात होणाऱ्या चर्चांचा दर्जा फार ढासळला आहे. आजकाल सभागृहांत चर्चा कमी आणि पत्रकं फेकणे, खुर्च्यांची मोडतोड करणे, इतर सभासदांना बोलू न देणे वगैरे प्रकार जास्त होत असतात. अशा स्थितीत सभापती/अध्यक्षांनी सभासदांना निलंबित केले तर त्यात त्यांचे काय चुकले?

(९८९ २१० ३८८०)


वारा-वारा
अतुल गुळवणी

## नगराध्यक्षांना शुभेच्छा

रायगडातील सहा नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होऊन नगराध्यक्षपदाची निवड प्रक्रियाही पूर्ण झालेली आहे. यामध्ये खालापूर, पाली, माणगाव, तळा, म्हसळा आणि पोलादपूर या नगरपंचायतींचा समावेश आहे. प्रत्येक पक्षाने आपले राजकीय अस्तित्व दाखवून या निवडणुका लढल्या आणि अपेक्षेप्रमाणे यशही संपादित केलेले आहे. आता निवडणुका संपल्या आहेत. जे निवडून आलेले नगराध्यक्ष, नगरसेवक आहेत त्यांनी आता पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवत आपाआपल्या नगरपंचायतींचा सर्वांगिण विकास कसा होईल याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. निवडणुकीच्या वेळी राजकारण ठीक आहे. पण प्रत्येकवेळी जर राजकारण करीत बसला तर नगरपंचायतींचा अपेक्षित विकास कदापि होणार नाही.उलट राजकीय वादात हा विकास अडकून तो खुंटला जाईल. यासाठी आता राजकीय पादत्राणे बाजूला काढून ठेवा आणि नव्या जोमाने विकासकामाला सुरुवात करा. कारण ज्या मतदारांनी मोठ्या विश्वासाने तुम्हाला, तुमच्या पक्षाला सत्ता दिली आहे त्या जनतेचा विश्वास कायम संपादित करणे हेच लोकप्रतिनिधींचे लोकशाहीतील महत्वाचे कार्य आहे. ज्या सहा नगरपंचायतींमध्ये या निवडणुका झाल्या त्यांचे आर्थिक उत्पन्न कशाप्रकारे वाढेल याचा सर्वांनीच गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. अजूनही मोठ्या प्रमाणात मुलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. मागील सत्ताधाऱ्यांनी एखादी चांगली गोष्ट सुरु केली असेल तर राजकीय आकसापोटी ती कामे पुन्हा नव्या जोमाने सुरु ठेवा. उगीच राजकीय वादावादीत ती कामे बंद पडली तर त्याचा परिणाम विकासकामांवर होऊन त्याची झळ सर्वसामान्याना बसते. नवीन कामे मंजूर करतानाही जी निश्चित कालावधीत पूर्ण होऊ शकतील आणि नगरपंचायतीला आर्थिकदृष्ट्या झेपू शकतील अशीच घेऊन ती पूर्ण करण्यावर भर दिला जावा. जेणेकरुन विकासाचा स्त्रोत सुरु राहील. आपण विश्वस्त आहोत, मालक नाहीत याच भूमिकेतून कामे करीत रहा. एवढेच सांगणे.

## निर्बंधमुक्त महाराष्ट्र

कोरोनाची तिसरी लाट येणार, मोठ्या प्रमाणात रुग्ण निर्माण होणार अशी वंदता गेले काही महिने राज्यासह संपूर्ण देशभरात ऐकावयास मिळत होती. पण सुदैवाने तसा प्रकार यावेळी घडला नाही. उलट विविध उपाययोजनांमुळे राज्यासह देशातील कोरोनाचे रुग्ण सातत्याने घटू लागल्याचे आशादायी चित्र निर्माण झाले आहे. याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्राची वाटचाल पुन्हा एकदा निर्बंधमुक्तीकडे सुरु झालेली आहे. तसे संकेतही राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिलेले आहे. शिवाय राज्यातील निर्बंध आणखी शिथिल करुन महाराष्ट्राला निर्बंधमुक्त करण्याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे सकारात्मक असल्याचे सूचक विधानही आरोग्यमंत्र्यांनी करुन सर्वांनाच दिलासा दिलेला आहे. महाराष्ट्र आता निर्बंधमुक्त होणे आवश्यक आहे. कारण गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्राचा रुतलेला आर्थिक गाडा आता कुठे गतिमान होताना दिसत आहे. विविध उद्योगांनी आपला वेगही वाढविलेला आहे. रोजगाराची निर्मितीही मोठ्या प्रमाणात होत आहे. पर्यटन स्थळांवरील बंदी उठविण्यात आल्याने महाराष्ट्र पुन्हा एकदा बहरताना दिसत आहे. त्याचा फायदा विविध व्यवसायावर अवलंबून असलेल्या छोट्या, मोठ्या घटकांना होताना दिसत आहे. त्याची आता खरी गरज आहे. कारण लॉकडाऊनमुळे लाखो कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन बंद झालेले होते. त्यातून ती कुटुंबे सावरत असतानाच जर पुन्हा निर्बंध लावले तर त्यांच्या जगण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. यासाठी आता पूर्णपणे निर्बंध उठविणे हे आवश्यक आहे. सरकारही त्याबाबत सकारात्मक आहे. यासाठी आरोग्यमंत्र्यांनी जे सूचक विधान केलेले आहे ते निश्चित स्वागतार्ह असेच आहे. ते निर्बंध उठविताना पुन्हा कोरोनाची साथ फैलावू नये यासाठी आवश्यक त्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. त्यात मास्क हा महत्वाचा घटक आहे. अनेक देशांनी मास्कमुक्ती केली आहे. मात्र महाराष्ट्रात अद्याप मास्क मुक्तीचा निर्णय घेण्यात आलेला नाही. काही हरकत नाही. मास्क लावून उद्योग व्यवसाय करणे फायद्याचे आहे.



## भगवद्गीता

म्हणून संपूर्ण वैदिक साहित्यामध्ये अणुरुप जीवात्म्याचे स्वरुप मान्य करण्यात आले आहे आणि कोणत्याही सुज्ञ मनुष्याला प्रत्यक्ष व्यवहारामध्ये याचा अनुभव येतो. केवळ अक्कलशून्य व्यक्तीच हा परमाणुरुप जीवात्मा सर्वव्यापी विष्णुतत्व आहे असे म्हणू शकते.

परमाणुरुप जीवात्म्याचा प्रभाव संपूर्ण शरीरभर पसरु शकतो. मुण्डकोपनिषदाप्रमाणे हा अणुरुप आत्मा प्रत्येक जीवाच्या हृदयामध्ये स्थित आहे. या अणुरुप आत्म्याचे मोजमाप करणे हे भौतिक वैज्ञानिकांच्या ग्रहणशक्तीच्या पलिकडे आहे आणि यामुळेच ते मूर्खपणाने प्रतिपादन करतात की, आत्मा अस्तित्वातच नाही. व्यक्तिगत अणुरुप आत्मा हा परमात्म्यासहित निश्चितपणे हृदयामध्ये आहे आणि म्हणूनच शारीरिक हालचालीसाठी लागणारी संपूर्ण शक्ती शरीराच्या या भागातूनच उत्सर्जित होते. फुफ्फुसातून प्राणवायू वाहून नेणाऱ्या पेशी आत्म्याकडून शक्ती प्राप्त करतात. जेव्हा जीवात्मा या ठिकाणाहून निघून जातो तेव्हा शरीरातील रक्तोत्पादनाचे कार्य थांबते. वैद्यकीय विज्ञान तांबड्या पेशींचे महत्व मान्य करते; पण शक्तीचे उगमस्थान हे आत्मा आहे याबद्दल ते निश्चितपणे सांगू शकत नाहीत. तरीसुद्धा वैद्यकशास्त्र मान्य करते की, हृदय हे शरीरास आवश्यक शक्तीचे उगमस्थान आहे.

परमात्म्याच्या अशा अणुरुप अंशाची तुलना सूर्यप्रकाशातील अणूंशी केली आहे. सूर्यप्रकाशामध्ये असंख्य तेजोमय अणू असतात. त्याचप्रमाणे भगवंतांची अंशरुपे म्हणजे भगवंतांच्या किरणातील आण्विक स्फुलिंग आहेत. यांना 'प्रभा' किंवा पराशक्ती असे म्हटले जाते. म्हणून कोणी वैदिक ज्ञानाचा पुरस्कर्ता असो अथवा आधुनिक विज्ञानाचा पुरस्कर्ता असो, तो शरीरातील आत्म्याचे अस्तित्व अमान्य करु शकत नाही. पुरुषोत्तम श्रीभगवंतांनी स्वतः भगवद्गीतेमध्ये या आत्म्याच्या विज्ञानाचे वर्णन विस्तृतपणे केले आहे.

**अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ।।१८।।**

अन्त-वन्तः- नाशवंत; इमे- हे सर्व; देहाः- भौतिक शरीरे; नित्यस्य- नित्य अस्तित्वात असणाऱ्या; उक्ताः- असे म्हटले जाते; शरीरिणः- देहधारी जीवाचे; अनाशिनः- अविनाशी; अप्रमेयस्य- अमर्याद असणाऱ्या; तस्मात्- म्हणून; युद्धस्य- युद्ध कर; भारत- हे भरतवंशजा.

अविनाशी, अमर्याद आणि शाश्वत जीवात्म्याच्या शरीराचा निश्चितपणे अंत होणार आहे, म्हणून हे भरतवंशजा! तू युद्ध कर.

तात्पर्य : स्वभावतःच भौतिक शरीर नश्वर आहे. त्याचा नाश तात्काळ किंवा शंभर वर्षांनंतरही होऊ शकतो. हा तर काळाचा प्रश्न आहे. या शरीराचे अनंत काळासाठी पालन करण्याची शक्यताच नाही; परंतु जीवात्मा हा इतका सूक्ष्म आहे की तो शत्रूला दिसूही शकत नाही, मारला जाण्याचे तर दूरच. पूर्वीच्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे तो इतका सूक्ष्म आहे की, त्याच्या आकाराचे मोजमाप कसे करावे याबद्दल कोणालाही कल्पनाही नाही. याप्रमाणे दोन्ही दृष्टिकोनातून पाहिल्यास शोक करण्याचे काहीच कारण नाही. कारण जीवात्म्याला त्याच्या स्वरुपस्थितीत मारणे शक्य नाही किंवा भौतिक शरीराचे दीर्घ किंवा अनंत काळासाठी रक्षणही करता येत नाही. परमात्म्याचा हा सूक्ष्म अंश त्याच्या कर्मानुसार भौतिक शरीर प्राप्त करतो आणि म्हणून धार्मिक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. वेदांत सूत्रामध्ये जीवाला तेजोगुणी म्हटले आहे कारण तो परमश्रेष्ठ प्रशाकाचाच अंश आहे. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश संपूर्ण सृष्टीचे पालनपोषण करतो त्याप्रमाणे जीवात्म्याचा प्रकाश या भौतिक शरीराचे पालनपोषण करतो. जीवात्म्याने भौतिक शरीराचा त्याग केल्यावर तात्काळ शरीर सडण्यास प्रारंभ होते. यावरुन कळून येते की, जीवात्मा हाच या शरीराचे पालन करतो. केवळ शरीर हे महत्वपूर्ण नाही. भौतिक शरीराबद्दल विचार न करता धर्माप्रीत्यर्थ युद्ध करण्याचा सल्ला अर्जुनाला देण्यात आला होता.

**(क्रमशः)**

**(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)**

## लोकसंसद

### आशादायक, दिलासादायक आणि कौतुकास्पद!

१ जानेवारी २०१९ ते १५ डिसेंबर २०२१ या काळातील ३६ महिन्यांमध्ये राज्यात बेकायदेशीर होणारे ११५० बालविवाह रोखण्यात संबंधितयंत्रणांनायशआलेआहे. बाल संरक्षण कक्ष, महिला व बालविकास विभागाचे अधिकारी, पोलिस यंत्रणा, सामाजिक संस्था यांच्या सहभागाने आणि संयुक्त प्रयत्नाने हे बाल विवाह थोपवण्यात यश आले. विशेष म्हणजे कोरोनाकाळामध्ये खंडित झालेले शिक्षण, आर्थिक टंचाई, मुलींची लग्न लावून देण्याकडे असलेला पालकांचा कल अशा अनेक कारणांमुळे बालविवाह होण्याचे प्रमाण वाढले होते. देशात बालविवाह विरोधी कायदा अस्तित्वात येऊन १६ वर्षे उलटली तरी आजही १८ वर्षाखालील मुलींचे लग्न होण्याचे प्रमाण २६ टक्के आहे. पुरोगामी महाराष्ट्रात हेच प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. त्यातच आता मुलींचे लग्नाचे वय २१ केल्याने हे प्रमाण वाढणार आहे. बालविवाहामुळे कमी वयात मुलीवर मातृत्वाची जबाबदारी आल्यामुळे त्या मुलीच्या आणि तिच्या बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. मुलीचा सर्वांगीण विकास खुंटतो. मुलींच्या एकूणच स्वातंत्र्यावर गदा येते. या पार्श्वभूमीवर, अवैधरित्या होणारे हे बालविवाह थांबावे व मुलींचे आयुष्य सुरक्षित राहावे यासाठी राज्यातील यंत्रणांनी सातत्याने केलेले प्रयत्न निश्चितच आशादायक, दिलासादायक आणि कौतुकास्पद आहेत.

- **प्रदीप शंकर मोरे**, अंधेरी

### हमारा बजाज हरपला

देशातीलच नव्हे तर जगातील सुप्रसिद्ध उद्योजक पद्मभूषण राहुल बजाज यांचे वृद्धपकाळाने शनिवारी निधन झाले. वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. १० जून १९३८ रोजी जन्मलेले राहुल बजाज यांनी अर्थशास्त्र आणि विधी शाखेत पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होते. १९६५ मध्ये त्यांनी बजाज उद्योग समूहामध्ये अधिकृत प्रवेश केला. १९६८ मध्ये बजाज ऑटोमध्ये मुख्य कार्यकारी पदावर रुजू झाले होते. वयाच्या तिसाव्या वर्षी बजाज ऑटोमध्ये मुख्य कार्यकारी पदावर रुजू होणारे ते सर्वात तरुण भारतीय ठरले होते. बजाज वाहन उद्योग समूहाला वाहन उद्योगात मोठे करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. १९८० मध्ये बजाज ही स्कुटर निर्मिती करणारी एकमेव स्कुटर होती. त्यांनी निर्मिती केलेली चेतक ही स्कुटर खूप लोकप्रिय झाली. त्याकाळी चेतक स्कुटर विकत घेणे हे माध्यमवर्गीयांचे स्वप्न होते. चेतक स्कुटर असणे हे त्याकाळी स्टेटस सिम्बॉल समजले जायचे. बजाज चेतक स्कुटर घेणारा माणूस श्रीमंत समजला जायचा. बुलंद भारत की बुलंद तसबीर... हमारा बजाज... ही त्या काळातील या स्कुटरची जाहिरात अजूनही लोक विसरले नाही. बजाज उद्योग समुहाचे अध्यक्ष असलेल्या राहुल बजाज यांनी गेल्या पन्नास वर्षात बजाज उद्योग समूहाला नावारूपाला आणले. त्यांच्या अतुलनीय कर्तृत्वामुळे ऑटोमोबाईल क्षेत्रात बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीने यशाचे शिखर गाठले. राहुल बजाज यांनी अनेक कंपन्यांचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. १९६५ मध्ये ३ कोटींची उलाढाल असणारी बजाज कंपनी त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि नेतृत्वगुणामुळे २००८ साली १० हजार कोटींची उलाढाल करणारी कंपनी बनली. २००६ साली त्यांना राज्यसभेवर नियुक्त करण्यात आले. राज्यसभेचे खासदार म्हणूनही त्यांनी चांगले काम केले. उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी विविध पुरस्कार देऊन गौरविले. २००१ मध्ये भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले. १९७९-८० आणि १९९९-२००० मध्ये दोनदा कॉन्फिडेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे (सीआयआय) अध्यक्ष म्हणूनही त्यांची निवड झाली होती. राहुल बजाज यांच्या जाण्यामुळे ऑटोमोबाईल उद्योगासह उद्योग जगतातील एक तारा आणि एक संवेदनशील व्यक्ती, अतिशय स्पष्टपणे आपली मते मांडणारा विचारवंत प्रसंगी सत्तेशी दोन हात करणारा योद्धा आपण गमावला आहे. त्यांच्या निधनाने 'बुलंद भारत की बुलंद तसबीर' निर्माण करणारे एक द्रष्टे उद्योगपती देशाने गमावले आहे. त्यांच्या निधनाने उद्योग क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. पद्मभूषण उद्योजक राहुल बजाज यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

- **श्याम ठाणेदार**, पुणे

### रहेना रहे हम महका करेंगे....

आपण भाग्यवान कारण आपलं बालपण लता दिदींच्या सुरमयी गाण्यात बहरलं तारुण्याचे हिंदोळे सुद्धा दिदींच्या गाण्यांवर झोके घेतले. स्वरवती नव्हे तर सरस्वती साक्षात स्वरांच्या माळा घेऊन या अवनीवर अवतरलेली. गेली कित्येक दशके आपल्या सुरेली कंठाने मंत्र मुग्ध करून सोडले. मोगरा फुलला मोगरा फुलला फुले वेचिता. गाणं ऐकतांना गाण्यांतील विलक्षण हळूवारपणा मनाचा ठाव घेतो. जशी एखादी आई आपल्या लहान मुलाच्या जखमेवर हळुवार फुंकर मारून दाह कमी करण्याचा प्रयत्न करते तसाच काहीसा आभास निर्माण होत आहे. हे शब्दांत मांडणे खूप कठीण आहे. तसेच, आता लवकरच शिवजयंती उत्सव येईल आणि जेव्हा जेव्हा शिवकल्याण राजाची गाणी लागतील तेव्हा दीदींच्या समरसून गायलेली ही गाणी म्हणजे अंगावर काटा येतोच. मग तो शिवबांचा पाळणगीत निज रे निज रे लडीवाळा असो की स्फुरण चढविणारे वेडात मराठे वीर दौडले सात... दिदींच्या जाण्याने प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न गीत हरवले आहे. तरीही आजही दीदी स्वर्गातून म्हणतच असतील की रहेना रहे हम महका करेंगे,बनके कली बनके सबा बाग ए वफा में

- **दत्तप्रसाद शिरोडकर**, मुलुंड

# कोकणात शिवसेना-भाजप आमनेसामने

## दंगल नियंत्रण पथक तैनात | नगरपंचायतीच्या आवारात वाहने नेण्यावरुन वाद

। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।

कुडाळ नगर पंचायतीच्या निवडणुकीपूर्वीच शिवसैनिक आणि राणे समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला. नगरपंचायतीच्या आवारात वाहने नेण्यास मनाई असतानाही शिवसेना आमदार वैभव नाईक यांनी गाडी आत घुसवल्याने त्याला भाजप कार्यकर्त्यांनी त्याला आक्षेप घेतला. त्यामुळे शिवसैनिक आणि भाजप कार्यकर्त्यांत शाब्दिक चकमकी उडाल्या.

दरम्यान,कुडाळच्यानगराध्यपदी काँग्रेसच्या आफ्रिन करोल या विजयी झाल्या आहेत. त्यांना ९ मते मिळाली तर भाजपच्या प्राजक्ता बांदेकरांना ८ मते मिळाली आहेत. त्यामुळे नारायण राणे यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

कुडाळ नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाची निवडणूक असल्याने नगरपंचायतीबाहेर मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी पंचायतीच्या परिसरात वाहने आणण्यास मनाई करण्यात आली होती. भाजपचे कार्यकर्तेही गाडीने पंचायतीच्या आवारात येत असताना त्यांना लांबच रोखण्यात आलं होतं. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांना त्यांची वाहने निषिद्ध क्षेत्राच्या बाहेर ठेवाव्या लागल्या होत्या. मात्र, शिवसेना आमदार वैभव नाईक हे घटनास्थळी आले. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवकही होते. त्यांच्या दोन गाड्या नगरपंचायतीच्या आवारात आल्याने त्याला भाजपने जोरदार आक्षेप घेतला. आमच्या गाड्या रोखल्या मग शिवसेनेच्या का रोखत नाही? असा सवाल भाजपने केला. त्यामुळे शिवसैनिक आणि भाजपमध्ये शाब्दिक चकमक उडाली. दोन्ही गटाकडून एकमेकांना धक्काबुक्की केली. शेकडो कार्यकर्ते एकाच ठिकाणी जमल्याने परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र, पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला.



**दोन्ही बाजूला कार्यकर्ते जमले**

*जमावाला पांगवण्यात यंत्रणा कमी पडत असल्याने पोलिसांनी तात्काळ दंगल नियंत्रण पथकाला घटनास्थळी पाचारण केलं. यावेळी डीवायएसपी आणि अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, पोलीस कुमक आल्यानंतरही या परिसरात तणावाची स्थिती आहे.*

*रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन्ही गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उभे होते. त्यानंतर निवडणुकीचा निकाल काँग्रेसच्या बाजूने येताच शिवसैनिक, काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी या परिसरात एकच जल्लोष केला. त्यामुळे पोलीस पुन्हा एकदा ॲलर्ट झाले होते.*

**म ह त्त्वा चे**

### तळवट येथे वृद्ध महिलेला मारहाण

खेड । प्रतिनिधी ।

तालुक्यातील तळवट गावात दि. ३० जानेवारी रोजी वृद्ध महिलेला मारहाण केल्याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात दि. १२ फेब्रुवारी रोजी एकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लता तातोजीराव पालांडे (७६, रा. तळवट, खेड) या वृद्ध महिलेला दीपक जयसिंग पालांडे (रा. तळवट, ता. खेड) याने ३० जानेवारी रोजी दुपारी दोन वाजता जयश्री जयसिंग पालांडे यांच्या घराच्या पडवीत पाठीमागून येऊन पाठीत लाथ मारून तिला खाली पाडून मारहाण केली होती. या मारहाणीत लता गंभीर जखमी झाली होती. या घटनेची माहिती लता पालांडे यांनी खेड पोलिसांनी दिल्यानंतर पोलिसांनी दीपक पालांडेविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### होळीसाठी विशेष दहा गाड्या

**सिंधुदुर्ग :** मध्य रेल्वेच्या सहकार्याने कोकण रेल्वेने आंगणेवाडी जत्रा आणि होळी सणाच्या पार्श्वभूमीवर तब्बल दहा विशेष गाड्या सोडणार असल्याची घोषणा केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षांपासून आंगणेवाडीची जत्रा रद्द करण्यात आली होती. मात्र, यंदा २४ फेब्रुवारीला ही जत्रा मोठ्या उत्साहात भरणार आहे.

# बोर्ड परीक्षेवर शिक्षकांचा बहिष्कार

## मागण्या तात्काळ मान्य करा : प्रा. कुलकर्णी

। चिपळूण । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित काम करत असलेल्या शिक्षकांचे प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने संबंधित शिक्षकांनी फेब्रुवारी/मार्च २०२२ च्या दहावी, बारावी बोर्ड परीक्षा कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. शिक्षकांच्या मागण्या तात्काळ मान्य करा, अशी आग्रही मागणी प्रा. दीपक कुलकर्णी यांनी केली आहे.

यासंबंधीचे निवेदन शिक्षक समन्वय संघातर्फे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांना देण्यात आले आहे. यामुळे परीक्षा मंडळाच्या कामकाजावर परिणाम होण्याची चिन्हे आहेत.

राज्यात विनाअनुदानित व अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या ६० टक्के आहे, त्यामुळे बोर्डाच्या कामकाजात या शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे आधी प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्याची मागणी होत आहे.

शिक्षकांचे मूलभूत प्रश्न शासन सोडवत नसल्याने दुर्दैवाने व नाईलाजास्तव बोर्ड परीक्षा कामकाजावर बहिष्कार टाकण्यात येत असल्याचे शिक्षक समन्वयक प्रा. दीपक कुलकर्णी यांनी सांगितले. राज्यात स्थानिक पातळीवर शिक्षकानी प्रत्येक शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात बहिष्काराचे पत्र संबंधित मुख्याध्यापकांना व विभागीय परीक्षा विभागाना दिले असल्याचे प्रा. दीपक कुलकर्णी यांनी माध्यमांना सांगितले.

# सिंधुदुर्गात तिसरी लाट उतरणीला

। चिपळूण । प्रतिनिधी ।

सिंधुदुर्गात कोरोनाची तिसरी लाट ओसरल्याचे चित्र आहे. गेल्या सात दिवसांत जिल्ह्यात १२० रुग्ण मिळाले असून, पाच रुग्णांचे निधन झाले. केवळ १८४६ नमुने तपासण्यात आले आहेत.

३१ डिसेंबर २०२१ रोजी जिल्ह्यात ५३ हजार २५२ एकूण बाधित रुग्ण होते. १४६४ मृत्यू होते, तर ६ लाख २ हजार एवढे एकूण नमुने चाचणी संख्या होती. आज बाधित संख्या ५७ हजार २५३ झाली. मृत्यू संख्या १५१९ झाली. चाचणी संख्या ६ लाख २५ हजार ४९३ झाली. जानेवारी महिन्यात २४ तासांत बाधित मिळणाऱ्या रुग्णांची संख्या २०० च्या वर गेली होती. मृत्यू संख्यासुद्धा दिवसाला दोन-तीन होती.

बाधित दर ३० टक्के गेला होता. मात्र, गेल्या आठ दिवसांत हा दर खूपच खाली आला असून, बाधित संख्या २० च्या घरात आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ५७ हजार २५३ कोरोना रुग्ण मिळाले आहेत. यातील ५५ हजार ४१९ रुग्ण कोरोनामुक्त झाले.

आतापर्यंत १५१९ रुग्णांचे निधन झाले. ३१५ रुग्ण उपचार घेत आहेत. यातील १२ रुग्ण शासननिर्मित कोविड केअर सेंटर, कोविड हेल्थ सेंटर व डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल या शासकीय संस्थेत उपचार घेत आहेत. उर्वरित ३०३ रुग्ण होम आयसोलेटेड आहेत, अशी माहिती प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. श्रीपाद पाटील यांनी दिली.

**॥ सात दिवसांत १२० बाधित**

जिल्ह्यात सद्यःस्थितीत ३१५ रुग्ण सक्रिय असून, त्यापैकी ५ रुग्णांची प्रकृती चिंताजनक आहे. यातील ४ रुग्ण ऑक्सिजनवर, तर १ रुग्ण व्हेंटिलेटरवर उपचार घेत आहेत. आर.टी.पी.सी.आर टेस्टमध्ये ३ लाख ३४ हजार ७८१ नमुने तपासण्यात आले.

यातील ४१ हजार ९२ नमुने पॉझिटिव्ह आले. आज नव्याने १७२ नमुने घेण्यात आले. ॲंटिजेन टेस्टमध्ये एकूण २ लाख ९० हजार ७१२ नमुने तपासले. पैकी १६ हजार ३९१ नमुने पॉझिटिव्ह आले. आज नवीन १४८ नमुने घेण्यात आले. आतापर्यंत एकूण ६ लाख २५ हजार ४९३ नमुने तपासण्यात आले.

# निखिल जामसंडेकरने १०० किल्ले केले सर

। साखरपा । वृत्तसंस्था ।

पोस्ट खात्यात मल्टि टास्क स्टाफमध्ये काम करत असताना इतिहास विषयाच्या आवडीमुळे सुट्टीच्या दिवसात साखरपामधील युवक निखिल जामसंडेकर याने १०० किल्ल्यांची सफारी केली.

वयाच्या २७ वर्षांपासून किल्ले भ्रमंती करण्यास प्रारंभ केला. रत्नागिरीमधील विजयगड किल्ला पार करत किल्ल्यांची मोहीम पूर्ण झाली. चिखली पोस्ट ऑफिसमध्ये सन २०१५ पासून तो खात्यात रुजू झाला. त्यानंतर त्याने या त्याच्या छंदाला प्रारंभ केला. सध्या तो रत्नागिरी मेन ब्रांच पोस्ट ऑफिसमध्ये कार्यरत आहे.



महाराष्ट्रातील कलावंतीण दुर्ग, कळसुबाई, साल्हेर यासारखी ट्रेकर लोकांना आव्हानात्मक असणारे किल्लेदेखील निखिलने लीलया पार केले आहेत. त्याचे मित्र अमर रानभरे, संकेत साळवी, भाई गांधी, विशाल कनवजे, शशांक वाघधरे, प्रज्योत पाताडे, सचिन चव्हाण, तृषांत चव्हाण आदींनी त्याला याकामी मदत केल्याचे सांगितले. शरीरात जोपर्यंत शक्ती आहे, तोपर्यंत जास्तीत जास्त किल्ले पार करणे हेच आपले ध्येय असल्याचे त्याने सांगितले.१०० किल्ल्यांवर न थांबता राज्यात जेवढे किल्ले आहेत, तेवढे आपण पूर्ण करणार असल्याचा निर्धार त्याने व्यक्त केला.

# गोडाऊनला आग

। कणकवली । वृत्तसंस्था ।

कणकवली शहरातील पंचायत समितीनजीक सर्व्हिस रोडवर असलेल्या इंगळे भंगार व्यावसायिक यांच्या गोडाऊनला शनिवारी रात्री अचानकपणे आग लागली. तात्काळ कणकवली नगरपंचायतीचा अग्निशामक बंब दाखल होऊन आग विझवण्यात आल्याने पुढील अनर्थ टळला. या आगीत भंगार सामानाचे नुकसान झाले आहे. स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली व नगरपंचायत बंब आल्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले.

# शिवसेनेवरील आरोप धादांत खोटे : तोडकरी

। खेड । प्रतिनिधी ।

शहरातील स्व. मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्र हे शिवसेना काळात उभारण्यात आले असले तरी त्याचे बांधकाम नगरपरिषदेने केले नव्हते, त्यामुळे तत्कालीन सत्तेत असलेली शिवसेना जबाबदार असल्याचा आरोप धादांत खोटा आहे, अशी माहिती माजी नगराध्यक्ष अरविंद तोडकरी यांनी दिली.

शहरात कौस्तुभ बुटाला यांनी केलेल्या आंदोलनात बोलताना माजी नगराध्यक्ष वैभव खेडकर यांनी नाट्यगृह बंद पडण्यास शिवसेना जबाबदार असल्याचा आरोप केला होता. या आरोपाचे खंडन करण्यासाठी शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष अरविंद तोडकरी पुढे आले आहेत.

याबाबत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, स्व. मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्राच्या बांधकामात भ्रष्टाचार झाल्याने ते अल्पावधीतच बंद करण्यात आले. त्यावेळी नगरपरिषदेत शिवसेनेची सत्ता होती, त्यामुळे याला शिवसेना जबाबदार असल्याचे गैरसमज पसरवून मनसे सत्तेत आली आहे. वास्तविक, १९९५ मध्ये रामदास कदम खेडचे आमदार असताना सांस्कृतिक केंद्र मंजूर करून घेतले. त्याठिकाणी सुमारे वीस ते पंचवीस लाखांची कामे तत्कालीन शिवसेना नगराध्यक्ष बिपीन पाटणे यांनी लक्ष दिल्याने कोणताही स्वरूपाचा भ्रष्टाचार झालेला नाही. शिवसेनेची सत्ता जाऊन आज पंधरा वर्षे उलटली आहे. या पंधरा वर्षांत केवळ अडीच वर्षे कालावधीत शिवसेना नगराध्यक्ष होते, मात्र मनसेचे खेडेकर हे केवळ जनतेची दिशाभूल करून शिवसेनेने भ्रष्टाचार केल्याचा अपप्रचार करत आहेत. पण, साडेबारा वर्षांच्या काळात त्यांची जबाबदारी नव्हती का, असा सवाल खेडेकर यांनी उपस्थित केला आहे.

## देश-विदेश

# निर्बंधात होणार शिवजयंती उत्सव

## शिवज्योतीसाठी २००, तर जन्मोत्सवास ५०० जणांना परवानगी; मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे निर्देश

। मुंबई । वृत्तसंस्था ।

**कोरोनाच्या पार्श्वभूमी गेले दोन वर्षे सण-उत्सवांवर बंदी होती. त्यामुळे शिवजयंती उत्सवही साधेपणाने साजरा करण्यात आला.**

यावर्षी मात्र, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या शिवज्योत दौडीत २०० जण आणि जन्मोत्सव सोहळ्याकरिता ५०० जणांना उपस्थित राहता येईल, अशा गृह विभागाच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्यता दिली.





तथापि, आरोग्य नियमांचे पालन करून, सर्वांच्या आरोग्याची आणि स्वच्छतेची काळजी घेत शिवछत्रपतींचा जन्मोत्सव सोहळ्याचे क्षण साजरे करावेत, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

येत्या शनिवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. त्या अनुषंगाने गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी शिवज्योत आणि जन्मोत्सव सोहळ्यातील उपस्थितीबाबत विशेष बाब म्हणून अनुमती देण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे सादर केला होता. त्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ही मान्यता दिली आहे आणि तसे निर्देशही गृह विभागासह संबंधित यंत्रणांना देण्यात येत आहेत. शिवजयंती उत्सवासाठी विविध शिव प्रेरणास्थळांवरून शिवज्योती वाहून आणण्यात येतात. त्यासाठी या शिवज्योत दौडीत २०० जणांना सहभागी होता येईल. तसेच शिवजन्मोत्सव सोहळ्यात ५०० जण उपस्थितीत राहू शकणार आहेत, या निर्णयामुळे शिवभक्तांना जल्लोषाचे वातावरण आहे.

### राज्यात दोन शिवजयंती नको

**राज्यात दोन वेगवेगळ्या तारखांना शिवजयंती साजरी न करता ती एकाच दिवशी साजरी करण्यात यावी, अशी मागणी आता शिवसेना आमदारांनी ठाकरे सरकारकडे केली आहे. तिथीनुसार शिवजयंती साजरी न करता ती तारखेनुसारच साजरी केली जावी, अशी भूमिका शिवसेना आमदार अंबादास दानवे आणि संजय शिरसाट यांनी मांडली आहे. तारखेनुसार १९ फेब्रुवारी या दिवशीच एकदाच शिवजयंती साजरी करण्यात यावी, अशी मागणी सरकारकडे करणार असल्याची माहिती शिवसेना आमदारांनी दिली आहे.**

# आर्यन खान ड्रगप्रकरणी वानखेडेंची पुन्हा चौकशी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

माजी एनसीबी अधिकारी समीर वानखेडे यांची एनसीबीने तब्बल २३ तास चौकशी केली. त्यामुळे आर्यन खान प्रकरणात वानखेडे यांच्यावर आरोप झाल्यानंतर आता वानखेडेंचा पाय खोलात घुसणार का? असा सवाल अनेकांना पडला आहे.



या चौकशीत एनसीबीच्या हाती काही लागलं किंवा नाही, याची मात्र स्पष्ट महिती अद्याप मिळू शकलेली नाही. येत्या मार्चमध्ये या चौकशीचा अंतिम अहवाल सादर होणार आहे. देशातल्या हायप्रोफाईल केसेपैकी एक आर्यन खान ड्रग्ज प्रकरण अत्यंत गाजलं. शाहरुख खानच्या मुलाला अटक झाल्याने देशात खळबळ माजली होती. यानंतर वानखेडे यांच्यावर काही गंभीर आरोप करण्यात आले. याबाबत अनेक राजकीय आरोप-प्रत्यारोपही झाल्याचे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. दरम्यान, ही कारवाई पूर्णपणे कायद्याचे पालन करून करण्यात आल्याचे वानखेडे यांच्याकडून सांगण्यात आलं.

# मराठा आरक्षणासाठी पुन्हा एल्गार

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मराठा आरक्षणासाठी २६ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा खासदार संभाजी छत्रपती यांनी दिला आहे. गरीब मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलन करतोय, असं संभाजी छत्रपती म्हणाले. मराठा आरक्षण आणि समाजाच्या प्रश्नांसाठी आझाद मैदानावर आमरण उपोषणाला सुरुवात करणार असल्याचं खासदार संभाजी छत्रपती म्हणाले.

शिवाजी महाराजांनी १८ पगड जाती, बारा बलुतेदारांना घेऊन स्वराज्य स्थापन केलं. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांना ५० टक्के आरक्षण दिलं. त्यामध्ये अनूसूचित जाती, अनूसूचित जाती, ओबीसी आणि मराठा समाज यांचा समावेश होता. २००७ पासून महाराष्ट्र पिंजून

काढला आहे. त्यावेळी मराठा समाज हा बहुजन समाजाचा भाग आहे. मराठा समाज आणि बारा बलुतेदारांना एकत्र कसं आणता येईल, यासाठी प्रयत्न केला. ५ मे २०२१ ला मराठा समाजाचं आरक्षण रद्द झालं. त्यानंतर आंदोलनं केली. मुख्यमंत्र्यांशी पत्रव्यवहार केला, आक्रमक आंदोलन केली.

मात्र, आता उद्विग्न झालोय. माझा कोणत्याही पक्षातील नेत्यांना विरोध नाही. ज्यावेळी आरक्षण रद्द झालं त्यावेळी सगळ्या घटकांना एकत्र घेऊन आपलं आरक्षण रद्द कसं झालं यासंदर्भात राजकीय नेत्यांसमोर भूमिका मांडली.

# इस्त्रोचे मिशन यशस्वी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय अंतरिक्ष संशोधन संघटना म्हणजेच इस्त्रोनं यावर्षीची पहिली मोहीम यशस्वीपणे फत्ते केली आहे. सोमवारी पहाटे ५.५९ वाजता सतीश धवन अंतरिक्ष केंद्र येथून पोलर सॅटेलाईट लॉंच व्हेईकल (PSLV-C52) येथून यशस्वी प्रक्षेपित करण्यात आलं. इस्त्रोनं झडडत-उ५२ मिशन अंतर्गत तीन सॅटेलाईट लॉंच केले आहेत. यामध्ये एजड-०४ रडार इमेजिंगचा समावेश आहे. यामुळे शेती, वनसंपदा आणि वृक्षारोपण, मातीमधील आर्द्रता, जलविज्ञान, पूर आणि हवामानाच्या स्थितीसंबधी हाय रिझोल्यूशनचे फोटोज उपलब्ध होणार आहेत. इस्त्रो आगामी काळात तीन महिन्यांत आणखी पाच लॉंचिंगच्या तयारीत आहेत. २०२२ चं पहिलं मिशन यशस्वी फत्ते झाल्यानं इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी आनंद व्यक्त केला.

# भारताकडून पुन्हा ५४ चिनी ॲप्सवर बंदी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केंद्र सरकारने ५४ हून अधिक चिनी ॲप्सवर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. या ॲप्सपासून भारतीयांच्या गोपनीयतेला आणि सुरक्षिततेला धोका आहे, असे हा निर्णय जारी करताना अधिकाऱ्यांनी सांगितले. याआधीदेखील सरकारने चिनी ॲप्सवर बंदी टाकली आहे.

बंदी घालण्यात आलेल्या यापैकी बरेच ॲप्स Tencent, Alibaba आणि गेमिंग फर्म NetEase सारख्या मोठ्या चिनी तंत्रज्ञान कंपन्यांचे आहेत आणि २०20 पासून भारतात बंदी घालण्यात आलेल्या ॲप्सचे नामांतर केलेले किंवा दुसऱ्या ब्रॅंडच्या नावाखाली नव्याने लॉंच केलेले आहेत.

हे ॲप्स चीनसारख्या परदेशातील सर्व्हरवर भारतीयांचा गोपनीय आणि संवेदनशील डेटा ट्रान्सफर करत असल्याच्या कारणावरून इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाने हे बंदी आदेश जारी केले आहेत, अशी माहिती एका इंग्रजी वृत्तपत्राने दिली. गुगलच्या प्ले स्टोअरसह टॉप ॲप स्टोअरनाही हे ॲप्लिकेशन ब्लॉक करण्याचे निर्देश दिले आहेत.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्ले स्टोअरवर भारतात ५४ ॲप्स आधीच ब्लॉक करण्यात आले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी Meity ने माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६९ अ अंतर्गत आपल्या अधिकारांचा वापर केला आहे.

# प्रेयसीने काढला प्रियकराचा काटा

## कुटुंबियांच्या मदतीने जिवंत जाळले, उपचारादरम्यान मृत्यू

। नाशिक । वृत्तसंस्था ।

प्रेम प्रकरणातून एका तरुणाला मारहाण करत जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना नाशिकमध्ये उघडकीस आलीय. १२ फेब्रुवारी रोजी संबंधित प्रकार घडला. तर १३ फेब्रुवारी रोजी म्हणजेच व्हॅलेंटाइन्स डेच्या पूर्वसंध्येलाच प्रेम प्रकरणामधून झालेल्या या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पीडित तरुणाचा उपचारादरम्यान सायंकाळी सातच्या सुमारास मृत्यू झाला.

ही घटना नाशिकच्या देवळा तालुक्यातील लोहोणेर गावात घडली आहे. ब्रेकअपनंतर प्रियकर प्रियसीच्या लग्नाला अडथळे आणत असल्याच्या रागातून ही घटना घडली आहे. या घटनेत जखमी युवक ५५ टक्के भाजला होता. उपचारादरम्यान दुसऱ्याच दिवशी त्याचा मृत्यू झाला.



नाशिकच्या देवळा तालुक्यातील लोहोणेर गावात राहणाऱ्या गोरख काशिनाथ बच्छाव या ३१ वर्षे युवकाला मारहाण करत जिवंत जाळल्याची घटना शनिवारी घडली होती. कल्याणी गोकुळ सोनवणे या युवतीसोबत गोरखचे मागील तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. मात्र, या प्रेम प्रकरणाला कल्याणीच्या कुटुंबियांचा विरोध असल्याने त्यांच्यातील प्रेमसंबंध तुटले होते. गोरखने मात्र कल्याणी आणि तिच्या कुटुंबियांकडे लग्नासाठी आग्रह धरला. मात्र, कल्याणीच्या कुटुंबियांनी गोरख सोबतच्या लग्नाला स्पष्ट नकार देत कल्याणीचं लग्न दुसरीकडे लावून देण्याचा निर्णय घेतला.

गोरखला ही बाब खटकली आणि त्याने कल्याणीच लग्न जिथे ठरले होते, ते लग्न मोडण्याचा प्रयत्न केला होता. याच रागातून शनिवारी दुपारच्या सुमारास कल्याणी सोनवणे आणि या युवतीचे आई-वडील भाऊ यांनी देवळा तालुक्यातील लोहोणेर गावात जाऊन गोरखला मारहाण केली आणि त्याच्या अंगावर पेट्रोल टाकून त्याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी देवळा पोलिसांनी कल्याणी सोनवणेसह तिचे वडील गोकुळ सोनवणे, आई निर्मला सोनवणे, भाऊ हेमंत सोनवणे आणि प्रसाद सोनवणे यांना अटक केली असून, पोलीस पुढील तपास करत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी दिली. गोरखच्या मृत्यूनंतर आता आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला जाणार आहे.

# गाडी पार्किंगवरुन मारामारी :आरोपी अटकेत

। रसायनी । वार्ताहर ।

रिस येथे वाहने पार्किंगवरुन हाणामारी होण्याची घटना रविवारी घडली. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ओटीभरण कार्यक्रमास बाहेरून स्वतःच्या गाड्या घेऊन पाहुणे आले होते. शेजारी असलेल्या असवले बिल्डींगमधील इसमासोबत रविवारी रात्री वाजण्याच्या सुमारास गाडी पार्किंग करण्यावरून वाद झाला. या वादात अभिषेक, कैलास व इतर ८ ते १० जणांनी प्रविण पांडुरंग ठोंबरे यांच्या डोक्यात व काका सुरेंद्र प्रभाकर चौधरी यांच्या उजव्या भुवयीच्यावर दगड मारून दुखापत केली. प्रविण ठोंबरे यांच्यावर नवी मुंबई येथील डी.वाय पाटील हॉस्पिटल येथे उपचार सूरू असून इतर नातेवाईकांना लाथा बुक्यांनी मारहाण झाली आहे. तर जखमी सुरेंद्र प्रभाकर चौधरी याच्यावर रिस येथील रेगे हॉस्पिटल चांभार्ली येथे उपचार सुरू आहेत. याप्रकरणी सागर चौधरी यांनी रसायनी पोलिसांत फिर्याद दिली असून आरोपींच्या रसायनी पोलिसांनी अभिषेक कैलास व इतर ८ ते १० इसमांच्याविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज गुंड अधिक तपास करत आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती. वैजयंती गोपीनाथ वार्डे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | ३२८ | ०-१९-५० | १.६९ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १५/२/२०२२

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

नमुना क्र.७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड

**चौकशीची जाहिर नोटीस** जाक्र/१९५/२०२२/न्याय शाखा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग याचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि.रायगड दि.१०/०२/२०२२

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक :- १२/२०२२
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :- shri Baliram Baburao Shelar Jan Aarogra kalyan Trust, Panvel, Tal- panvel जि.रायगड ....बाबत

श्री.Dr.Vinay Baliram Shelar ....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे नमूद केलेल्या फेरफार अहवाल/नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम-१०,०००/-रूपये
(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही. असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०/०२/२०२२ रोजी दिली.

सही/-
**(श्रीमती.अंजली रमेश पिसाळ)**
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड.

---

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.जि.रायगड**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. /२०२२

**सौ.मनिषा बबन पाटील**
वय ४९ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.बी.१०४, तारांगण हौ.सोसायटी
बी विंग, स्वाती बिल्डींग,अलिबाग
ता.अलिबाग,जि.रायगड } अर्जदार

ज्या अर्थी या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,
१)अर्जदार हिचे वडिल कै.नामदेव शंकर पाटील यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.
२)अर्जदार हिचे वडिल कै.नामदेव शंकर पाटील यांच्या खालील नमूद केलेल्या मिळकतीमधील असलेला १/२ अविभाज्य हिस्सा आहे.
अ)मौजे अलिबाग, सर्व्हे नं.१३५/१, १३६/६ या मिळकतीवर असलेली वसंत पुष्प को.ऑप.हौ.सोसायटी, अलिबाग मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.२०४, बी.विंग, क्षेत्र ६८५ चौ.फुट कारपेट, ९२५ चौ.फुट असून त्याचा अलिबाग नगरपालिका मालमत्ता क्र.१४०९ बी विंग, नवीन मालमत्ता क्र. झेड १ बी एच अे ००१६६९ असा आहे.
ब)मौजे मोरोंडे, ता.अलिबाग, येथील गट नं.८ क्षेत्र ०-२६-५० हे.आर.आकार ३-०५ रू. पैसे या मिळकतीमधील १/२ हिस्सा
क)मौजे खंडाळे, ता.अलिबाग येथील गट नं.३५२, क्षेत्र ०-१२-० हे.आर, आकार २-८१ रू.पैसे या मिळकतीमधील १/२हिस्सा
ड) मौजे नेहुली ग्रामपंचायत खंडाळे, ता.अलिबाग, येथील घर क्र.२१२, क्षेत्र १२४० चौ.फुट या मिळकती मधील १/२ हिस्सा
अशाप्रकारे वर नमुद केलेल्या मिळकती आहेत.
सदर वर नमूद केलेल्या मिळकती अर्जदार यांना मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वरील सर्व वर नमूद केलेल्या मिळकतींचे कायदेशीर वारस म्हणून वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. मयत कै.नामदेव शंकर पाटील यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या अर्जाची पुढील दि.२८/२/२०२२ रोजी स्वतःअगर त्यांचे प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत सकाळी १०.३० वा.मे.न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.
सदरची नोटीस आज दिनांक १० माहे २ सन २०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री.अशोक काशिनाथ परदेशी यांनी खालील मिळकतीच्या परिशिष्टांमध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.तुकाराम सावळाराम म्हसे यांचेकडून कायम मालकी हक्काअन्वये विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे परिशिष्टः-**
**मौजे.वारे, ता.कर्जत, जि.रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ५८ | १ | ०-४२-००<br>पो.ख.०-०१-५०<br>...........<br>एकूण ०-४३-५० | ४ | ३८ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, बक्षीसपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १४/०२/२०२२
पत्ताः ब्लॉक नं.१०३, बुरहान प्लाझा
कॉलेज रोड, आयुष नर्सिंग होम समोर
ममदापूर, ता.कर्जत,जि.रायगड
मो.९०११५५५८०१.

सही/-
**ॲड.अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

---

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वाना कळविणेत येते की, खालील नमूद मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे मालक श्री.भरत तुकाराम दळवी यांचेकडून सदर मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे हेदवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९२ | ७ | ००-२७-०० | ००-२५ |

वरील तद्ंगभुत हक्कहितसंबंध सुध्दा

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.संदिप हरिश्चंद्र मसणे**
कोर्ट व्हयु बिल्डिंग फ्लॅट नं.१०१
पहिला मजला दिवाणी कोर्ट समोर,
ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.९६०४५४५७७७

---

RDCC Bank
Let's grow together

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

**निविदा सूचना**

बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग येथील यु.पी.एस. व यु.पी.एस.बॅटरी (भंगार) ची विक्री करावयाची असून इच्छुक निविदाधारकांकडून निविदा मागविण्यांत येत आहे. स्क्रॅप मटेरियल केंद्र कार्यालय अलिबाग येथे इच्छुक निविदाधारकांना कार्यालयीन वेळेत पाहता येईल. स्क्रॅप मटेरीयलमधील प्रती किलो दराचा स्पष्ट उल्लेख असावा.
इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक :२२.०२.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.
कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

सही/-
केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक- १५.०२.२०२२
**मुख्य कार्यकारी अलिबाग**

---

### नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नांदईपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री.दत्ताराम गजानन थळे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दंगदावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे-नांदईपाडा, ता.अलिबाग, जिल्हा.रायगड**

| मौजे | ग.नं | एकूण क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नांदईपाडा ता.अलिबाग | २२४/१ | ०-३९-४०<br>पो.ख.०-०२-४०<br>एकूण ०-४१-८० | ७.१७ |

पैकी श्री.दत्ताराम गजानन थळे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२१-०० हे.आर. या क्षेत्रापैकी ०-१८-०० हे.आर.इतके क्षेत्र

दिनांक :- १४/०२/२०२२
अशिलांची सही
वंदना दत्तात्रेय चोगले

**ॲड.हर्षल रविंद्र पाटील**
बी.कॉम.एलएल.बी
ऑफिस पत्ताः मु.लोणघर, पो.कामार्ले,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.९०२११६६०३९

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. प्रसन्न यशवंत खडपे, रा. सातिर्जे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरवून तसा रितसर साठेकरार त्यांचेबरोबर झालेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | ३२२ | ०-७९-४०<br>पो. ख. ०-०६-१०<br>०-८५-५० | १५.१६ |
| सातिर्जे | ३२४ | ०-४१-९०<br>पो. ख. ०-०३-५०<br>०-४५-४० | ९.९४ |
| सातिर्जे | ३२६ | ०-०६-६०<br>पो. ख. ०-००-५०<br>०-०७-१० | १.५६ |
| सातिर्जे | ३३० | ०-०६-०० | १.३१ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही त-हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १५/२/२०२२

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-भादाणे, ता.अलिबाग, गट नं.१०४, क्षेत्र ०-५१-३० हे.आर., पो.ख.०-०२-८० हे.आर., एकूण क्षेत्र ०-५४-१० हे.आर., आकार ९.८७ रू.पै.मिळकतीचे विद्यमान मालक नलिनी सदाशिव शिंदे, विश्वनाथ सदाशिव शिंदे, राजेंद्र सदाशिव शिंदे, श्रध्दा मोहन खोपडे, निता लक्ष्मण देसाई यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख १४/०२/२०२२

**(ॲड.संजय द.म्हात्रे)**
सितास्मुती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग, जि.रायगड

---

### जाहीर नोटीस

आमचे आशिल सौ.वसुधा विलास पानसरे, रा.भालचंद्र स्मृति, बिल्डींग नं.१, वरसोली, ता.अलिबाग-रायगड यांजतर्फे जाहीर नोटीस देण्यात येते की,

मौजे वेश्वी, ता.अलिबाग, गट व उपविभाग नं.१३७, क्षेत्र ०-३४-४०, पो.ख.०-००-५०, आकार ४.६२ पैसे पैकी नरेश रामभाऊ नाईक यांचे मालकीची दक्षिण दिशेकडील ०-१६-९५, पो.ख.०-००-५०, आकार २.२८ पैकी ०-१२-० गुंठे क्षेत्र मिळकत हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

आमचे अशिलाने वर नमुद केलेल्या मिळकतीचा साठेकरार यापुर्वीच केलेला आहे. सदरच्या साठेकरारापोटी आमचे अशिलांनी ठरलेल्या किंमतपैकी काही रक्कम विद्यमान मालक नरेश रामभाऊ नाईक यांस रोख तसेच धनादेशाने बयाणापोटी दिलेली आहे. परंतु आजतागायत जमीन मालक नरेश रामभाऊ नाईक यांनी साठेकरारातील अटी व शर्तीचे पालन जाणूनबुजून केलेले नाही. त्यामुळे सदरचा व्यवहार आमचे अशिलांस पुर्ण करता येत नाही.

असे असतानाही नरेश रामभाऊ नाईक हे आमचे अशिलांचे अपरोक्ष, आमचे अशिलांचा विश्वासघात करून वर नमूद केलेली जमिन अन्य त्रयस्त इसमास विक्री करू पहात आहेत. याबाबत आमचे अशिलांस खात्रीची माहिती मिळालेली आहे.

तरी वर नमुद केलेल्या जमिनीच्या व्यवहार कोणीही नरेश रामभाऊ नाईक यांचे सोबत करू नये, तसे केल्यास त्यास आमचे अशिलाची सक्त हरकत राहील व आमचे अशिल संबंधित व्यक्ती व जमिन मालक यांचेविरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील.

अलिबाग
१४.०२.२०२२

सही/-
**ॲडव्होकेट मिलिंद चव्हाण**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,


मौजे-बेलवली,ता.अलिबाग, गट नं.३२३, क्षेत्र ०-३३-९० हे.आर., पो.ख.०-०२-७० हे.आर., एकूण क्षेत्र ०-३६-६० हे.आर., आकार ६.२१ रू.पै.ही मिळकत जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याच्या हक्कांगासह, मिळकतीचे विद्यमान मालक पन्नालाल अगरचंद तपाडीया व देवांग हरिदास ठक्कर दोघेही रा.मु.पो.झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख १४/०२/२०२२

**(ॲड.संजय द.म्हात्रे)**
सितास्मुती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग, जि.रायगड

---

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाली, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| वाली | ९२९ | ०-०१-५०<br>१-६९-७०<br>१-७१-२०<br>पो. ख. ०-५६-२०<br>२-२७-४० | १.२२ | यशवंत नारायण पिंपळे |
| वाली | ९५८ | ०-३१-००<br>०-३०-००<br>०-६१-०० | ०.१८ | दिपक भालचंद्र पवार, |
| वाली | १०२९ | १-३५-०० | १.०६ | केदार गोपिनाथ साळवी |
| वाली | १०३० | १-६८-००<br>पो. ख. ०-२४-००<br>१-९२-०० | १.१९ | नेहा नितीन पिंपळे |
| वाली | १०८७ | ०-४०-००<br>०-८९-००<br>१-२९-००<br>पो.ख.०-१९-००<br>१-४८-००<br>पैकी ० हे.४० आर | ५.४७ | जयवंती लक्ष्मण पवार,<br>शांताराम लक्ष्मण पवार,<br>शशिकला शांताराम जाधव,<br>सुवर्णा शांताराम खेराडे,<br>नमिता नामदेव मायनेकर,<br>लिलावती जनार्दन खेराडे,<br>वासंती शांताराम बुरटे, |
| वाली | १०८७ | ०-४०-००<br>०-८९-००<br>१-२९-००<br>पो. ख. ०-१९-००<br>१-४८-००<br>पैकी १ हे. ०८ आर. | ५.४७ | नेहा नितीन पिंपळे, |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १५/२/२०२२

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**
**जि.रायगड**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. /२०२२

**सौ.मनिषा बबन पाटील**
वय ४९ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.बी.१०४, तारांगण हौ.सोसायटी
बी विंग, स्वाती बिल्डींग,अलिबाग
ता.अलिबाग,जि.रायगड } अर्जदार

ज्या अर्थी या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की,
१) अर्जदार हिची आई कै.प्रभावती नामदेव पाटील यांचे वारस म्हणून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.
२) अर्जदार यांची आई कै.प्रभावती नामदेव पाटील हिचे नावे खालील नमूद केलेल्या सेव्हिंग खाते व मुदत ठेवी असून त्या खालील नमुद केल्याप्रमाणे आहेत.
अ) स्टेट बँक ऑफ इंडिया श्रीबाग शाखेमधील मुदत ठेव पावती क्र.३२४४९५०६५२१ असून तिची रक्कम रू.९,४३,१८९/- दि.२६.०७.२०२१ पासून त्यावरील व्याजासहीत
ब) स्टेट बँक ऑफ इंडिया श्रीबाग शाखेमधील मुदतठेव पावती क्र. ३२४४९५०६६०० असून तिची रक्कम रू.८,४८,८६७/- दि.२६.०७.२०२१ पासून त्यावरील व्याजासहीत
क) स्टेट बँक ऑफ इंडिया श्रीबाग शाखेमधील मुदतठेव पावती क्र.३२४५१७९६८०५ असून तिची रक्कम रू.८६,७८८/- दि.२७/०७/२०२१ पासून त्यावरील व्याजासहीत
ड) स्टेट बँक ऑफ इंडिया श्रीबाग शाखेमधील सेव्हिंग खाते क्र.३२४४९३४६९०७ असून त्यामध्ये रक्कम रू.३,३४६/- व त्यावरील व्याजासही होणारी रक्कम
अशाप्रकारे वर नमूद केलेले 'अ ते ड' यामधील रक्कमा असून त्या रक्कमा व त्यावरील व्याज अशी सर्व रक्कम आहे.
सदर वर नमूद ठेवीतील रक्कमा व त्यावरील व्याज अर्जदार यांना मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वरील सर्व वर नमुद मुदत ठेवीतील रक्कमा व त्यावरील व्याज मिळण्याकरीता कायदेशीर वारस म्हणून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. कै. प्रभावती नामदेव पाटील, यांच्या पश्चात अर्जदार हे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या वारस हक्काबद्दल कुणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या अर्जाची पुढील दि.२८/२/२०२२ रोजी स्वतःअगर त्यांचे प्रतिनिधी वा वकील यांचेमार्फत सकाळी १०.३० वा मे.न्यायालयात हजर राहून नोंदवावी. अशी कोणतीही हरकत आली नाही तर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.
सदरची नोटीस आज दिनांक १० माहे २ सन २०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**कनिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**वरिष्ठ स्तर**
**अलिबाग-रायगड**



## १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा

# रायगडचा हिंगोलीवर विजय

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

नाशिक येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षाखालील मुलांच्या आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये रायगड संघाने आपल्या गटातील पहिल्या सामन्यामध्ये हिंगोली विरुद्ध विजय मिळवून सामन्याचे पूर्ण गुण वसूल केले. नाशिक विरुद्धचा दुसरा सामना अनिर्णित राहिला.

हिंगोली विरुद्धचा सामना महात्मा नगर क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात हिंगोली संघाने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात ९७ धावा केल्या. रायगडच्या अमेय पाटील याने १२ षटकात १७ धावा देऊन ५ बळी घेतले. त्याला साईराज जोशी याने आठ षटकात २२ धावात २ बळी व कप्तान ओम म्हात्रे याने ४ षटकात २६ धावात ३ बळी घेऊन मोलाची साथ दिली. रायगड संघाने आपल्या पहिल्या डावात २१४ धावा केल्या. आघाडीचे फलंदाज विनोद भोईर ७७ चेंडूत ४० धावा व क्रिश भाईरा ८३ चेंडूत ६१ धावा यांनी २४.१ षटकांमध्ये १०० धावांची भागीदारी करून चांगली सुरुवात करून दिली. हिंगोली संघ दुसऱ्या डावात १२९ धावात गारद झाला. या डावात देखील रायगडच्या अमेय पाटील याने पुन्हा १४.१ षटकात ३३ धावांत ५ बळी घेतले व संपूर्ण सामन्यात १० बळी घेण्याची किमया केली. त्याला दुसऱ्या बाजूने ३१ धावांत ३ बळी घेऊन साईराज जोशीने चांगली साथ दिली. रायगड संघाने आपल्या दुसऱ्या डावात लक्ष ५.२ षटकांमध्ये १३ धावा करून विजय मिळवला. सामन्याचे पूर्ण गुण वसूल केले.

रायगडाचा गटातील दुसरा सामना नाशिक विरुद्ध झाला. या महत्त्वपूर्ण सामन्यामध्ये रायगड संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला व आपल्या द्रुतगती गोलंदाजांनी पहिल्या ५.१ षटकांमध्ये २ बळी मिळवत कप्तानाचा हा निर्णय सार्थ ठरवला. परंतु नंतर नाशिकच्या फलंदाजांनी शंभर धावांची भागीदारी करून डाव सावरला. त्यानंतर मात्र ठराविक अंतराने रायगडच्या गोलंदाजांनी बळी मिळवत नाशिकचा पहिला डाव २२८ धावांमध्ये संपवला. रायगडच्या शौर्य गायकवाड याने सतरा षटकांमध्ये ४४ धावा देऊन सर्वाधिक ५ बळी घेतले व त्याला अमेय पाटील व साईराज जोशी यांनी प्रत्येकी २ बळी घेत सुंदर साथ दिली. नंतर फलंदाजी करताना रायगडच्या पार्थ पवार २० धावा व क्रिश बहिरा ७९ यांनी ५७ धावांची भागीदारी नोंदवत चांगली सुरुवात करून दिली. तिसऱ्या विकेट करता ३३ धावांची भागीदारी करताना क्रिश पाटील याने २८ चेंडूत २६ धावा केल्या. पाचव्या विकेट करता पुन्हा क्रिश बहिरा व कप्तान व म्हात्रे यांनी ३०.१ षटकांमध्ये ६८ धावांची भागीदारी नोंदवली. सहाव्या विकेट करता कप्तान ओम म्हात्रे व निलेय सावंत यांनी ७.२ षटकांमध्ये २२ धावांची भागीदारी केली. तेव्हा रायगडचा धावफलक ७८.५ षटकांत ६ बाद १९१ असा होता. पुढे ठराविक अंतराने रायगडचे फलंदाज बाद होत गेल्याने रायगड संघाचा धावफलक नऊ बाद २१२ असा झाला. त्यानंतर शेवटच्या गड्या करता स्मित पाटील नाबाद ११ धावा व साईराज जोशी नाबाद ७ धावा यांनी अखेरपर्यंत किल्ला लढवत उर्वरित ५.१ षटकांमध्ये १६ धावा केल्या. शेवटच्या चेंडूवर चार धावा हव्या असताना दोघांनी तीन धावा पळून काढल्या त्यामुळे संघाचा धावफलक ९ बाद २२८ असा झाला व सामना बरोबरीत सुटला. नाशिक विरुद्ध हिंगोली व रायगड विरुद्ध औरंगाबाद या लढतींच्या निकालावर पुढील सुपर लीग फेरी करीता कोण पात्र ठरणार हे निश्चित होईल.

## जामरुंग सरपंच चषकात

# कामतपाडा संघ विजयी

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील नव्याने अस्तित्वात आलेल्या जामरुंग ग्रुपग्रामपंचायतचे सरपंच दत्तात्रय पिंपरकर यांच्या संकल्पनेतून सरपंच चषक २०२२ या टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत कामतपाडा गाव क्रिकेट संघाने विजेतेपद पटकावले.

जामरुंग ग्रामपंचायतीमधील बाळ गोपाळ क्रिकेट संघाने सरपंच चषक २०२२ चे आयोजन केले होते. पिंपरकर यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा ग्रामपंचायत मधील गावांचे क्रिकेट संघ यांच्यात रंगली. अनिल पिंपरकर आणि पवन मेदगे तसेच बाळ गोपाळ क्रिकेट संघाने पुढाकार घेऊन रंगलेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कामतपाडा गाव क्रिकेट संघाने पेठ गाव क्रिकेट संघावर विजय मिळविला.

तर जामरुंग गावाच्या संघाला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

दुर्गम गावांनी बनलेल्या जामरुंग ग्रुप ग्रामपंचायतीमधील खेळाडूंना क्रिकेट या खेळात चालना मिळावी यासाठी प्रोत्साहन म्हणून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. सहभागी सर्व आठ संघांकडून कोणत्याही स्वरूपात प्रवेश फी आकारली नव्हती. स्पर्धेत मालिकावीर पुरस्काराचा मानकरी अभिषेक सावंत ठरला तर उत्कृष्ठ गोलंदाज म्हणून रोशन सावंत तर उत्कृष्ठ फलंदाज अरविंद बांगर यास सन्मानित करण्यात आले. विजेत्यांना रोख रक्कम तसेच सरपंच चषक २०२२ देण्यात आला.



या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य आणि माजी सभापती नारायण डामसे यांच्या हस्ते झाले तर पारितोषिक वितरण सरपंच दत्तात्रय पिंपरकर यांचे हस्ते झाले. त्यावेळी उपसरपंच शिवाजी बिबवे, ग्रामपंचायत सदस्य संदेश सावंत, सुनिता मेदगे, वेदिका सावंत, रोहिणी घुडे, अश्विनी पिंपरकर, रेखा शेंडे, फसाबाई ठोंबरे, छगन गावंडा, ज्योत्स्ना मेदगे तसेच डुक्करपाडा तसेच स्थानिक सर्व गावातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## गावदेवी क्रिकेट क्लब सुकेळी आयोजित स्पर्धेत

# जय वाघेश्वर तामसोली संघ विजेता

**। सुकेळी । वार्ताहर ।**

ऐनघर विभागीय क्रिकेट असोसिएशनतर्फे गावदेवी क्रिकेट क्लब सुकेळी यांच्या वतीने स्पर्धा आयोजित केलेल्या होत्या. सामन्यांचे उद्घाटन रविवार (दि.१३) रोजी सुकेळी येथील राम तेलंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तो जय वाघेश्वर तामसोली संघ. या संघास रोख रक्कम ७,०००/- रु.व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.



तर द्वितीय क्रमांक गावदेवी सुकेळी व तृतीय क्रमांक जय हनुमान वेताळवाडी या संघास देण्यात आले. या सामन्यांमध्ये उत्कृष्ट फलंदाज जय हनुमान वेताळवाडी संघाचा महेश वाळगुडे, उत्कृष्ट गोलंदाज गावदेवी सुकेळी संघाचा ओमकार समन, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रजत तेलंगे, सामनावीर सौरभ कणघरे, पब्लिक हिरो विशाल सुटे, तर सिक्सर किंग सौरभ कणघरे यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

## आयपीएल २०२२ च्या

# मेगा ऑक्शनची सांगता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बंगळुरूमध्ये आयपीएल २०२२ मेगा ऑक्शन यशस्वीरित्या पार पडले. काल आणि आज झालेल्या या महालिलावात अनेक खेळाडूंचे नशीब उघडले, तर काहींना अजून या श्रीमंत क्रिकेट लीगमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

डावखुरा फलंदाज इशान किशन (१५.२५) या लीगचा सर्वात महागडा खेळाडू ठरला. तर लिलावाच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या लियाम लिव्हिंगस्टोनने ११.५० कोटींची कमाई केली. विशेष म्हणजे मिस्टर आयपीएल अशी ओळख असलेल्या सुरेश रैनाला संघात घेण्यात चेन्नईने रस दाखवला नाही. आता अहमदाबाद आणि लखनऊ या दोन नवीन संघाची एन्ट्री झाल्यामुळे चाहत्यांना लीगच्या प्रारंभाची उत्सुकता लागली आहे.




खारघर : येथे महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन आयोजित दिव्यांग, मास्टर्स व ज्युनियर महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरशौष्ठव विजेत्या स्पर्धकांना चषक पालिका विरोधी पक्ष नेता प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी मधुकर तळवलकर, वर्ल्ड बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सेक्रेटरी चेतन पाठारे, महाराष्ट्र बॉडीबिल्डींग असोसिएशनचे प्रशांत आपटे, वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे लिगल ॲडव्हायझर विक्रम रोठे, इंडियन बॉडी बिल्डींग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी हिरल शहा, महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश सावंत, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि बॉडीबिल्डर सुभाष पुजारी तसेच स्पर्धक व प्रेक्षक उपस्थित होते.

## 'आयपीएल २०२२'साठी

# मुंबई इंडियन्स सज्ज

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या महालिलावादरम्यान, मुंबई इंडियन्सने आपला संघ तयार करण्यासाठी हुशारीने खेळी केली. लिलावाच्या दोन्ही दिवशी काही मोठी नावे मुंबईत सामील झाली होती. पहिल्याच दिवशी मुंबईने इशान किशनला १५.२५ कोटींमध्ये खरेदी करून मोठा धमाका केला.

दुसऱ्या दिवसाच्या लिलावात मुंबई इंडियन्सचे लक्ष जोफ्रा आर्चरवर होते. मुंबईने इतर संघांसह बोली युद्ध जिंकले आणि आर्चरला आठ कोटी रुपयांना विकत घेतले. पहिल्या दिवसाच्या लिलावात मुंबई इंडियन्सची फळी शांत दिसत होती, पण दुसऱ्या दिवशी काही खेळाडू त्यांच्या निशाण्यावर होते. वेगवान गोलंदाज जयदेव उनाडकटला मुंबईने विकत घेतले. यावेळीही सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरला मुंबई इंडियन्सने संघात सामील केले.

## मुठवली क्रिकेट स्पर्धेत

# लांढर संघ ठरला अंतिम विजेता

**। खांब-रोहा । वार्ताहर ।**

रोहे तालुक्यातील मुठवली खु.येथे झालेल्या क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात लांढर संघाने सर्वोत्तम खेळ करीत विजेतेपद पटकावले आहे. रोहा तालुका शिवछत्रपती क्रिकेट असोशियन पिंगळसई-धामणसई व मुठवली विभाग यांच्या वतीने जय भवानी मित्र मंडळ मुठवलीखुर्द यांच्या वतीने संपन्न झालेल्या या सामन्यांचे उद्घाटन महेंद्र पोटफोडे, जयवंत मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मोठ्या उत्साहात संपन्न झालेल्या या स्पर्धेत जाणता राजा अ या संघाने उपविजेतेपद पटकावले.तर धामणसई अ व मुठवली ब संघांनी



अनुक्रमे तुतीय व चतुर्थ क्र.पटकावले. मालिकावीर म्हणून विवेक शिंदे (लांढर) यांनी उत्कृष्ट गोलंदाज म्हणून तर अविनाश शेळके (मुठवली) तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून रत्नेश मोहिते (पिंगळसई) यांनी पटाकावले.

या विजेत्या संघांना व सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना अनंत देशमुख, योगेश शिंदे, शिवाजी पाशिलकर, महेश तुपकर, मारूती तुपकर, मंगेश तुपकर, येणाजी शिंदे, वसंत शिंदे, राम सावंत, निलेश शिंदे आदी मान्यवरांचे हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.




**श्रीवर्धन : जीवना कोळीवाडा येथे शिवगर्जना क्रिकेट क्लब आयोजित स्पर्धेत दांडा पॅकर संघानी प्रथम क्रमांक पटकाविला असून बेस्ट बॅस्टमन प्रथमेश मयेकर बेस्ट बॉलर तुषार चौलकर यांना मिळाला आहे.**

## पुलवामा हल्ल्यात शहीद वीरांना श्रद्धांजली

**वर्षा मेहता**

**। अलिबाग ।**




पुलवामा दहशतवादी हल्लूयात केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) च्या शहीद जवानांना श्रद्धांजली. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जैश-ए-मोहम्मद (गशच्) च्या दहशतवाद्याने स्फोटकांनी भरलेले वाहन त्यांना घेऊन जाणाऱ्या बसवर धडकले तेव्हा ४० CRPF जवान शहीद झाले.

SOCIAL MEDIA पडसाद

## ओस्तवाल, तांबे महाराष्ट्राच्या रणजी संघात



कौशल तांबे | विकी ओस्तवाल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

डावखुरा फिरकी गोलंदाज विकी ओस्तवाल आणि अष्टपैलू कौशल तांबे या भारताच्या युवा विश्वचषक विजेत्या संघातील दोन खेळाडूंना महाराष्ट्राच्या रणजी संघात स्थान देण्यात आले आहे.

ग-गटात समावेश असलेल्या महाराष्ट्राची १७ फेब्रुवारीपासून हरयाणाशी पहिली लढत सुरू होणार आहे. अंकित बावणेच्या नेतृत्वाखालील या संघात आघाडीचा फलंदाज राहुल त्रिपाठीकडे उपकर्णधार सोपवण्यात आले आहे. ऋतुराज गायकवाडची वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी निवड झाल्याने तो रणजीच्या साखळी टप्प्यासाठी उपलब्ध होऊ शकणार नाही, असे महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने म्हटले आहे.

**कृषीवल**

**क्रीडा संघटनांना आवाहन**

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

- मुख्य संपादक





## भगवद्गीता स्पर्धा

**हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.**

**विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,**
**खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)**
**दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.**
***(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)***
**अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.**

**श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१**
**पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.**

## भंडारी चषक क्रिकेट स्पर्धा

# भंडारी योद्धा संघ प्रथम

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग येथील भंडारी बहुउद्देशीय सामाजिक संस्था अलिबाग यांच्या वतीने किहीम येथे आयोजित करण्यात आलेल्या भंडारी चषक क्रिकेट स्पर्धेत श्रीवर्धन दांडा येथील भंडारी योद्धा संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. संघ नायक रुपेश चांदविडकर यांच्या नेतृत्वाखालील संघाला ४४,४४४ रु. आणि आकर्षक चषक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. उत्कृष्ठ गोलंदाज म्हणून उत्तम भाटकर यांचा गौरव करण्यात आला.

द्वितीय क्रमांक अर्णव इलेव्हन श्रीवर्धन, तृतीय क्रमांक राज इलेव्हन मुरूड, चतुर्थ क्रमांक जय हनुमान





कातळपाडा (अलिबाग), मालिकाविर- पराग खोत, (राज इलेव्हन मुरूड) उत्कृष्ट फलंदाज- गौरव बोरकर (भंडारी योद्धा श्रीवर्धन-दांडा), उत्कृष्ट गोलंदाज - नितेश (अर्णव इलेव्हन श्रीवर्धन यांना मिळाला आहे.

सामनावीर साई मंगेश मांजरेकर यांना मिळाला आहे. रायगड जिल्ह्यातील भंडारी समाजातील १६ संघांचा या स्पर्धेत समावेश होता. यावेळी बहुउद्देशिय सामाजिक संस्थेचे मान्यवर उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)